


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २७९ ■ शनिवार, दि. १८ एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

## बायकोने प्रेयसीला संपवलं....

**पुणे:** भाजपच्या पुण्यातील विधी शाखेचा अध्यक्ष एडवोकेट संजय सावंतला अनैतिक संबंधातून सेक्रेटरीचा खून केल्याबद्दल अटक करण्यात आली आहे. संजय सावंत सोबत त्याची पत्नी आणि अल्पवयीन मुलीलाही खुनात सहभागी असल्याबद्दल अटक करण्यात आलीय. पुनम दिनेश मुन (वय ३५) असं खुन झालेल्या महिलेचं नाव आहे. पुनम मुन या एडव्होकेट संजय सावंतच्या मुंढवा भागातील कार्यालयात सेक्रेटरी म्हणून काम करत होत्या. मात्र त्यांचे संजय सावंत यांच्यासोबत अनैतिक संबंध असल्याचा संशय संजय सावंतची पत्नी स्वाती सावंतला होता. त्यातून पूनम मुन हिच्यासोबत त्यांचे वाद होत होते.

# लोकशाहीचा विजय झाला...!

वृत्तसंस्था १८ एप्रिल



**नवी दिल्ली:** काल जे घडले तो लोकशाहीचा मोठा विजय आहे. लोकशाही कमकुवत करण्याचा सरकारचा कट उधळला गेला. हा संविधान, देश आणि विरोधी पक्षांच्या एकतेचा विजय होता.' असा दावा कॉंग्रेस खासदार प्रियांका गांधी यांनी आज केला.

पंतप्रधानांनी आपल्या भाषणात वारंवार सांगितले की, जर तुम्ही याच्याशी असहमत असाल, तर तुम्ही इथे बसू शकत नाही. त्यांच्या हेतूने आम्हाला धक्का बसला. त्यांना वाटले की, जर हे विधेयक मंजूर झाले, तर ते जिंकतील; अन्यथा, ते प्रत्येक नेत्याला महिला-विरोधी सिद्ध करून महिलांचे तारणहार बनतील.दरम्यान, लोकसभेत संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयक फेटाळल्यानंतर, केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू शनिवारी म्हणाले, 'कॉंग्रेस पक्ष आणि विरोधी पक्षांना देशातील महिलांच्या रोषाला सामोरे जावे लागेल. त्यांच्यावरील हा काळा डाग कधीही पुसला जाणार नाही.' पंतप्रधानांनी त्यांच्या भाषणात वारंवार सांगितले की, जर तुम्ही याच्याशी सहमत नसाल, तर तुम्ही इथे बसू शकत नाही. त्यांच्या हेतूने आम्हाला धक्का बसला. माझा विश्वास आहे की हा संपूर्ण कट रचला गेला कारण त्यांना सत्तेत राहायचे आहे. ते आता केले जाणार नाही; मतदारसंघ पुनर्रचना २०२९ पर्यंत होणार नाही. हे महिलांच्या नावावर केले जात होते. त्यांना सत्तेत राहण्याचे स्वातंत्र्य देण्यासाठी हे होते. केंद्र सरकारला वाटले की, जर हे विधेयक मंजूर झाले, तर त्यांचा विजय होईल. जर ते मंजूर झाले नाही, तर प्रत्येक विरोधी पक्षनेत्याला महिला-विरोधी सिद्ध करून ते महिलांचे तारणहार बनतील. विरोधी पक्षाने निषेध केला याचा मला आनंद : हे स्पष्ट आहे की हा मुद्दा मतदारसंघ पुनर्रचनेचा होता, महिलांचा नाही. विरोधी पक्षाने निषेध केला याचा मला आनंद आहे. हा त्यांच्यासाठी काळा दिवस आहे, कारण हे कसे घडले याने त्यांना धक्का बसला आहे.

### संसद तहकूब

लोकसभा आणि राज्यसभेचे कामकाज १० मिनिटे चालले. त्यानंतर, दोन्ही सभागृहांचे कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आले. संसदेच्या विशेष अधिवेशनाचा तिसरा दिवस सकाळी ११ वाजता सुरू झाला. लोकसभा अध्यक्षांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान झालेल्या कामाचा आढावा दिला.

### तो देशासाठी काळा दिवस होता - रिजिजू म्हणाले

संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले, 'कॉंग्रेस पक्ष आणि विरोधी पक्षांना देशातील महिलांच्या रोषाला सामोरे जावे लागेल. त्यांच्यावरील हा काळा डाग कधीही पुसला जाणार नाही. हे एक ऐतिहासिक विधेयक होते, ज्याने महिलांना संसद आणि राज्य विधानमंडळांमध्ये जागा दिल्या. याला विरोध करण्याचे काय कारण असू शकते? तो देशासाठी एक काळा दिवस होता.'

### महिला आरक्षणाशी संबंधित विधेयक नामंजूर

महिला आरक्षणाशी संबंधित संविधानाचे १३१ वे दुरुस्ती विधेयक सरकार लोकसभेत मंजूर करू शकले नाही. यात संसदेच्या ५४३ जागा वाढवून ८५० करण्याचा प्रस्ताव होता. लोकसभेत विधेयकावर २१ तास चर्चा झाल्यानंतर मतदान झाले. उपस्थित ५२८ खासदारांनी मतदान केले. बाजूने २९८, विरोधात २३० मते पडली. विधेयक मंजूर करण्यासाठी दोन तृतीयांश बहुमताची आवश्यकता होती. ५२८ चे दोन तृतीयांश ३५२ होतात. अशा प्रकारे विधेयक ५४ मतांनी नामंजूर झाले. १२ वर्षांच्या राजवटीत ही पहिलीच वेळ होती, जेव्हा मोदी सरकारला सभागृहात कोणतेही विधेयक मंजूर करता आले नाही. शुक्रवारी नामंजूर झालेल्या विधेयकाचा परिणाम असा होईल की, महिला आरक्षण २०२९च्या लोकसभा निवडणुकीत लागू होऊ शकणार नाही.

# अक्षय्य तृतीयेचा हा शुभ मुहूर्त अजिबात चुकवू नका...!

## दोन दिवस शुभ मुहूर्त असल्याने सर्वांना मिळाला दिलासा

प्रतिनिधी १८ एप्रिल

**अकोला:** हिंदू धर्मात अक्षय्य तृतीयेला फार शुभ आणि फलदायी तिथी मानलं जातं. वैशाख महिन्याच्या शुक्ल पक्षातील तृतीया तिथीला अक्षय्य तृतीया साजरी केली जाते. या दिवशी केलेल्या शुभ कार्याचं फळ कधीच संपत नाही. त्यामुळेच याला 'अक्षय्य' असं म्हणतात.

अक्षय्य तृतीयेच्या दिवशी सोनं-चांदी खरेदी करणं, दान-पुण्य करणं तसेच, एखाद्या नवीन कार्याची सुरुवात करणं फार शुभकारक मानलं जातं. त्यानुसार, यंदा अक्षय्य तृतीयेला सोनं खरेदी करण्याचा शुभ मुहूर्त नेमका कोणता ते जाणून घेऊयात. यंदा तृतीया तिथीची सुरुवात १९ एप्रिल रोजी सकाळी १० वाजून ४९ मिनिटांनी होणार आहे. तर, २० एप्रिल रोजी सकाळी ७ वाजून ४९ मिनिटांपर्यंत असणार आहे. खरंतर, १९ एप्रिल रोजी अक्षय्य तृतीया साजरी करण्यात येणार आहे. मात्र, २० एप्रिल रोजी उदय तिथीनुसार, सकाळी शुभ योग निर्माण होणार आहे. जर तुम्हाला अक्षय्य तृतीयेच्या दिवशी सोनं किंवा चांदी खरेदी करायची असेल तर १९ एप्रिल रोजी सकाळी १० वाजून ४९ मिनिटांपासून ते संपूर्ण दिवसभर तुम्ही सोनं खरेदी करु शकता. या व्यतिरिक्त २० एप्रिल रोजी सकाळी ५ वाजून ५१ मिनिटांनी सकाळी ७ वाजून २७ मिनिटां पर्यंत हा शुभ काळ असणार आहे. अक्षय्य तृतीया हा हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र आणि साडेतीन मुहूर्तांपैकी एक महत्त्वाचा सण आहे. वैशाख महिन्याच्या शुक्ल पक्षातील तृतीयेला हा सण साजरा केला जातो.



## अखेर १८ वर्षीय तरुणी गेली तरी कुठे ?

प्रतिनिधी १८ एप्रिल

**धुळे :** धुळे शहरातील एक १८ वर्षीय तरुणी हवेत हात वर करत म्हणजे कुणीतरी हाताला धरू नेल्यासारखे अचानक बेपत्ता झाल्यामुळे एकच खळबळ माजली आहे. या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्यात ही तरुणी अत्यंत गुढपणे चालत जात असल्याची दिसून येत आहे.

यासंबंधीच्या वृत्तानुसार, संजीवनी राहुल वराडे असे बेपत्ता झालेल्या तरुणीचे नाव आहे. ती धुळ्यातील शासकीय दूध डेअरी परिसरातील सहजीवन नगर येथून शुक्रवारी दुपारी बेपत्ता झाली. गत काही दिवसांपासून धुळ्यात महिला व मुली बेपत्ता होण्याच्या अनेक घटना घडल्यात. या सर्व घटना आमिष दाखवून किंवा फुस लावून पळवून नेल्याच्या आहेत. पण संजीवनी वराडेची घटना काही औरच आहे.

# भोंदू खरात प्रकरणात भक्कम पुरावे गोळा करा

प्रतिनिधी १८ एप्रिल



**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी पोलिसांना भोंदू अशोक खरात प्रकरणात भक्कम पुरावे गोळा करण्याचे निर्देश दिले. प्रस्तुत प्रकरणात कुणीही दोषी असला तरी त्याला कठोर शिक्षा झाली पाहिजे. त्यासाठी या प्रकरणात भक्कम पुरावे गोळा करा. तपासात अपराधसिद्धी हाच महत्त्वाचा घटक असला पाहिजे, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी नाशिक धर्मांतर प्रकरणाचाही विस्तृत आढावा घेतला. राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी गृहविभागाची तातडीची आढावा बैठक घेतली. त्यात त्यांनी नाशिकच्या भोंदू अशोक खरात व आयटी धर्मांतर प्रकरणासह परतवाडा व गोरेगाव ड्रग्ज प्रकरणाच्या तपासाचा विस्तृत आढावा घेतला. या बैठकीला पोलिस महासंचालक, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, एसआयटी प्रमुख व इतर वरिष्ठ पोलिस अधिकारी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री प्रस्तुत प्रकरणांत आरोपी कोण आहेत? हे न पाहता संबंधितांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिल्याचा दावा सूत्रांनी केला

## गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या टाकीत चक्क मेलेलं माकड सापडलं

प्रतिनिधी १८ एप्रिल

**अकोला :** अकोला जिल्ह्यातील खिरपुरी बुद्रुक ग्रामपंचायतचा भोंगळ कारभार समोर आला आहे. यात चक्क ग्रामस्थांच्या जीवाशी खेळ खेळाला जातोय का? असा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या टाकीत चार दिवसांपासून माकड मरून पडल्याचे आढळून आलंय. धक्कादायक बाब म्हणजे त्याच टाकीतून गावकऱ्यांना चार दिवस दुर्गंधीयुक्त आणि घाण पाण्याचा पुरवठा करण्यात आला आहे. या प्रकरणी गावकऱ्यांनी सरपंचसह सचिव आणि कर्मचाऱ्यांवर कारवाईची मागणी केली आहे.

अकोला जिल्ह्यातील खिरपुरी बुद्रुक ग्रामपंचायतीचा भोंगळ आणि संतापजनक कारभार समोर आलाय. चार दिवसांपूर्वी गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या टाकीत माकड मरून पडले होते. मात्र, त्याच टाकीतून ग्रामपंचायतीने चार दिवस गावकऱ्यांना दुषित पाणीपुरवठा केलाय. गावातील नळांमधून दुर्गंधीयुक्त आणि घाण पाणी येत असल्याने गावकऱ्यांनी टाकीची तपासणी केली असता हा धक्कादायक प्रकार समोर आलाय. गावकऱ्यांनी यासंदर्भात ग्रामसेवक आणि ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांवर कारवाईची मागणी केली.

## अल्पवयीन मुलीला त्रस्त केल्या प्रकरणी आरोपीला पाच महिने कैदेची शिक्षा


**अकोला :** १६ एप्रिल रोजी जिल्हा व सत्र न्यायाधीश ए.डी. क्षीरसागर यांनी आरोपी शुभम विठ्ठल अरखराव रा. आगीखेड ता. पातुर यास अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिला त्रस्त केल्या प्रकरणी पाच महिने साध्या कैदेची शिक्षा सुनावली.

आरोपी मुलीच्या मागे चकरा मारून वाईट नजरेने पाहुन त्रास देत होता. पिडिता घरी एकटीच असताना आरोपी ०५/०९/२०१८ रोजी घरी येउन म्हणाला की, 'तु माझेसोबत लग्न कर, लग्न केले नाही तर मी माझे जीवाचे बरे वाईट करेल अशी धमकी देऊन गालावर चापट मारली'. याप्रकरणी ५ महिने साधा कारावास व रु. २५००/- दंड व दंड न भरल्यास १५ दिवस साधी कैद तसेच कलम ३२३ अंतर्गत दोषी ठरवून २ महिने साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली व दंडाच्या रकमेतुन २,०००/- पिडितेला नुकसान भरपाई असा आदेश दिला.









२
सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
शनिवार, दि. १८ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# अक्षय्य तृतिया साडेतीन मुहूर्तांपैकी एक

*जल, वायू, अग्नी, तेज, पृथ्वी ही पंचमहाभूते अक्षय्य मानली गेली आहेत. पृथ्वी निर्माण झाल्यापासून लक्षवधी वर्षे लोटली. मात्र, या अक्षय्य गोष्टी आजही अस्तित्वात आहे. जाणून घेऊया अक्षय्य तृतियेचे महत्व. आपल्या पंचांगाप्रमाणे सूर्योदयाची तिथी मानण्याची प्राचीन परंपरा असल्यामुळे अक्षय्य तृतिया १९ एप्रिल २०२६ रोजी साजरी केली जाणार आहे. या दिवशी सुरू केलेल्या कुठल्याही कार्याचा क्षय होत नाही असे म्हणतात.*



शिवाय या दिवशी आपण ज्या वस्तुंचे दान करतो त्या अक्षय प्रमाणात म्हणजेच विपुल प्रमाणात पुन्हा आपल्याला मिळतात म्हणुन अक्षयतृतीयेचं विशेष महत्व समजल्या जातं. वैशाख मासातील शुक्ल पक्षातील तृतीया ही अक्षय तृतीया म्हणुन प्रसिध्द आहे. या दिवशी पाण्याचे दान करण्याचा देखील प्रघात आहे. या दिवसाला इतके महत्व का आहे जाणून घेऊया यासंबंधी आणखी काही गोष्टी.

दान व हवनाला महत्व

आपल्या प्राचीन संस्कृती, परंपरांमध्ये साडेतीन मुहूर्त अत्यंत महत्त्वाचे मानले गेले आहेत. त्यापैकी एक अक्षय्य तृतीया असल्यामुळे यालाही अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. श्रीकृष्णाने युधिष्ठिराला असे सांगितले होते की, या तिथीस केलेले दान व हवन क्षयाला जात नाही. म्हणून ही तिथी अक्षय्य मानली गेली आहे. देव आणि पूर्वज यांना उद्देशून या तिथीस जे कर्म केले जाते, ते सर्व अक्षय्य (अविनाशी) होते. जो मनुष्य या दिवशी गंगा स्नान करेल, तो सर्व पापांतून मुक्त होतो, अशी मान्यता आहे. या दिवशी विष्णूंचा सहावा अवतार परशुराम यांची पूजा करून त्यांना अर्घ्य दिले जाते. ? भगवान परशुराम जयंती म्हणून हा दिवस साजरा केला जातो. महाराष्ट्रात परशुराम जयंती निमित्त शोभायात्रा काढण्यात येतात. तसेच या दिवशी पितरांना पान दाखवले जाते. घटाची मांडणी करून पूजा केली जाते. या दिवशी शुभ कार्य सुरू केले जातात. तसेच नवीन वस्तू, दागिने, गृह, वाहन खरेदी केली जाते. अतिशय मंगलमय अशी तिथी मानली जाते. घरात सुख समृद्धी राहावी अशी प्रार्थना इष्ट देवतेला केली जाते.

# विद्यापीठांना परदेशी विद्यापीठांशी सहयोगासाठी विदेशी मंत्रालयाची परवानगी आवश्यक

१० एप्रिल, २०२६ ला महाराष्ट्र राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालयाने, राज्याच्या मुख्य सचिव कार्यालयाच्या आदेशानुसार, राज्याच्या सर्व कुलगुरूंना व उच्च शिक्षण संचालकांना पत्र लिहून विदेशी संस्था व कार्यालय यांच्या सोबत /बैठक/विचार विनिमय करण्यापूर्वी केंद्र शासनाच्या विदेश मंत्रालयाची परवानगी घेणे आवश्यक आहे, असे कळविले आहे. यासंदर्भात असे पण ऐकिवात आहे की महाराष्ट्रातील काही विद्यापीठांच्या उच्च पदस्थ व्यक्तींनी परदेशी विद्यापीठांशी सामंजस्य करार करण्याच्या निमित्ताने, परदेशी दौरे, विदेशी मंत्रालयाची मंजुरी न घेता केले आहेत.

या बद्दल सप्टेंबर २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने झांबियन ओपन युनिव्हर्सिटी, जे एक खाजगी विद्यापीठ आहे, त्यांच्याशी सांस्कृतिक आणि शैक्षणिक देवाणघेवाण कार्यक्रमांसाठी सामंजस्य करार केला. हा सामंजस्य करार करण्यासाठी मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू व प्रा. जयदीप निकम हे जातीने आफ्रिका खंडातील झांबिया या देशात गेले होते. याबद्दलची माहिती प्रा.डॉ. संजय खडक्कार, माजी विद्वत परिषद सदस्य, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व विद्यापीठ अनुदान आयोगाला कळविले होते. आता विद्यापीठांना विदेशी मंत्रालयाची परवानगी घेणे बंधनकारक असेल. त्यामुळे विद्यापीठांतील उच्च पदस्थ व्यक्तींच्या अनावश्यक परदेशी दौऱ्यांवर चाप बसू शकेल.

# उन्हाळ्यात होमिओपॅथीची सनकूल प्रभावी औषधे

अकोला जिल्हा तप्त उन्हासाठी आधी पासून ओळखला जातो. सध्या अकोल्याचे तापमान देशात सर्वाधिक आहे. ४४ अंशावर नोंद झाली आहे. अशा वेळी उन्हापासून बचाव करणे आवश्यक आहे. अशा वेळी होमिओपॅथीची सनकूल औषधे उपयुक्त ठरतात.

उन्हाळ्यातील उष्णता, उष्माघात, त्वचेची जळजळ आणि डिहायड्रेशन यांसारख्या समस्यांवर होमिओपॅथीमध्ये प्रभावी आणि 'सनकूल' औषधे उपलब्ध आहेत. ही औषधे शरीराचे तापमान नियंत्रित करण्यास मदत करतात.

उन्हाळ्यासाठी काही प्रमुख होमिओपॅथिक औषधे खालीलप्रमाणे आहेत: ग्लोनोइन ३०/२००: उन्हात फिरल्यामुळे होणारी तीव्र डोकेदुखी, चक्कर येणे, चेहरा लाल होणे आणि उष्माघाताचा त्रास झाल्यास हे औषध अत्यंत गुणकारी आहे.



**बेलाडोना ३०:** शरीरात अति उष्णता निर्माण होणे, त्वचा लाल होऊन जळजळणे आणि डोकेदुखीसाठी हे औषध उपयुक्त आहे.

**नेट्रम म्युर ३०:** उन्हामुळे त्वचेवर पुरळ उठणे, डोकेदुखी आणि अशक्तपणा वाटत असल्यास हे औषध अत्यंत गुणकारी ठरते.

**एपिस मेलिफिका ३०:** त्वचेची आग होणे, सूज येणे किंवा पित्त उठणे यावर उपयुक्त आहे.

**उर्टिका युरेन्स ३०:** उन्हाळ्यातील घामोळ्या, त्वचेची जळजळ आणि खाज सुटण्यावर हे उत्तम औषध आहे.

**हेमामॅलिस ३०:** उन्हाळ्यामध्ये नाकातून रक्त येणे किंवा उष्णतेमुळे होणारा रक्तस्त्राव रोखण्यासाठी हे उपयुक्त आहे.

**आर्सेनिक अल्बम ३०:** उन्हाळ्यातील जुलाब, मळमळ आणि डिहायड्रेशनसाठी हे औषध दिले जाते.

महत्त्वाचे म्हणजे कोणतीही होमिओपॅथिक औषधे घेण्यापूर्वी तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला अवश्य घ्या. उन्हाळ्यात काळजी घेणे आवश्यक आहे. दिवसभरात भरपूर पाणी प्या, बाहेर पडताना डोके आणि चेहरा झाकून ठेवा. गूळ, पपई यांसारखे उष्ण पदार्थ टाळा.

**डॉ. गायत्री देशमुख**
गुरुकृपा, एमडी, होमिओपॅथी, अकोला.

# पशुपालकांसाठी सुवर्णसंधी : 'पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड अंतर्गत 3 लाखांपर्यंत अर्थसहाय्य

**पुणे/अकोला :** राज्यातील पशुपालन, शेळी-मेंढीपालन, कुक्कुटपालन आणि वराहपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्यासाठी पशुसंवर्धन विभागातर्फे 'पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड' (KCC) मोहीम राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत पशुपालकांना त्यांच्या पशुधनाच्या देखभालीसाठी व दैनंदिन खर्चासाठी (खेळते भांडवल) आकर्षक व्याज सवलतीसह कर्ज उपलब्ध करून दिले जात आहे.

या योजनेंतर्गत ज्या शेतकऱ्यांकडे किसान क्रेडिट कार्ड नाही, त्यांना १.६० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज विनातारण उपलब्ध करून दिले जाईल. दूध संस्थेने हमी दिल्यास ही मर्यादा ३ लाख रुपयांपर्यंत वाढवता येते. तसेच, ज्यांच्याकडे आधीच किसान क्रेडीट कार्ड आहे, त्यांनाही ३ लाखांपर्यंतची पतमर्यादा वाढवून घेता येईल.

कर्जाचा मूळ व्याजदर ९ टक्के असला तरी, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून ३ टक्के आणि राज्य शासनाच्या ११ फेब्रुवारी २०२६ च्या निर्णयानुसार ४ टक्के अशी एकूण ७ टक्के पर्यंत व्याज सवलत मिळू शकते. बँकांनाही यात २ टक्के व्याज सवलत देण्यात आली आहे. त्यामुळे नियमित कर्जफेड करणाऱ्या पशुपालक/शेतकऱ्यांना या योजनेंतर्गत शून्य टक्के व्याजदराचाही लाभ घेता येऊ शकतो. सन २०२६-२७ पासून 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' (राज्य व जिल्हास्तर) अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना या क्रेडिट कार्डद्वारे खेळते भांडवलाचा लाभ घेता येईल. राज्यातील १० लाख पात्र पशुपालकांना या योजनेच्या कक्षेत



आणण्याचे उद्दिष्ट पशुसंवर्धन विभागाने ठेवले आहे. अधिक माहितीसाठी नजीकच्या पशुवैद्यकीय चिकित्सालयात अथवा १९६२ या हेल्पलाइन नंबरवर संपर्क साधावा.

जे पशुपालक दूध सोसायटी, दूध संघ किंवा दूध उत्पादक कंपनीचे सभासद आहेत व ज्यांनी अद्याप या योजनेचा लाभ घेतलेला नाही, असे सर्व शेतकरी या मोहिमेसाठी पात्र आहेत. जिल्ह्याचे 'पशुसंवर्धन उपआयुक्त' या योजनेचे सनियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहत आहेत. सद्यस्थितीत पशुपालन करणाऱ्या ज्या पशुपालकांनी या योजनेचा लाभ घेतलेला नाही, अशा पात्र पशुपालकांना या योजनेंतर्गत लाभ घेता येईल.

## पात्रता

१) प्रकल्प धारकाने केंद्र/राज्य शासन/जिल्हा परिषदेच्या कोणत्याही अनुदान योजनेचा लाभघेतलेला नसावा.

२) पशुपालन प्रकल्पांमधील सर्व पशुधनाची एनडीएलएम (भारत पशुधन) पोर्टलवर नोंदणी आवश्यक आहे.

३) व्याज परतावा सवलत पुढीलप्रमाणे कमाल पशुधन संख्या असलेल्या पशुपालकांनाच अनुज्ञेय राहिल.

I. २५,००० मांसल कुक्कुट पक्षी / ५०,००० किंवा त्यापेक्षा कमी अंडी उत्पादक कुक्कुट पक्षी

II. ४५,००० किंवा त्यापेक्षा कमी क्षमतेच्या हॅचरी युनिट

III. १०० किंवा त्यापेक्षा कमी दुधाळ जनावरांचा गोठा

IV. ५०० किंवा त्यापेक्षा कमी मेंढी / शेळी गोठा

V. २०० किंवा त्यापेक्षा कमी वराह

४) पशुपालकांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड कर्ज उचल केलेल्या तारखेपासून एक वर्षाच्या आत संपूर्ण कर्ज परतफेड करणे आवश्यक राहील.

५) सदर योजनेच्या निकषाप्रमाणे तसेच, त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या बदलास अनुसरुन आवश्यक त्या बाबींची पूर्तता करणे लाभार्थ्यांस बंधनकारक असेल.

'पशुधनाच्या संगोपनासाठी आर्थिक अडचण भासू नये, तसेच ग्रामीण भागात पशुधन व्यवसायाला चालना मिळावी, यासाठी जास्तीत जास्त पात्र पशुपालकांनी आपल्या जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी किंवा दूध संस्थेशी संपर्क साधून या योजनेचा लाभ घ्यावा.'

**डॉ. किरण पाटील,** आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-६७

## दिन विशेष

# जागतिक वारसा दिन

१८ एप्रिल रोजी जगभरात जागतिक वारसा दिन (World Heritage Day) किंवा 'मारके आणि स्थळांसाठी आंतरराष्ट्रीय दिवस' साजरा केला जातो. UNESCO च्या सहकार्याने, ICOMOS (इंटरनॅशनल कौन्सिल ऑन मोन्युमेंट्स अँड साईट्स) सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि नैसर्गिक वारसा स्थळांचे जतन आणि संरक्षणाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी हा दिवस साजरा करते.

**जागतिक वारसा दिनाचे प्रमुख पैलू :** मानवी संस्कृतीच्या ऐतिहासिक स्थळांचे संरक्षण करणे आणि त्याबद्दल तरुणांमध्ये जागरूकता निर्माण करणे.

**इतिहास :** १९८२ मध्ये घ्यश्ध्य़ ने या दिवसाचा प्रस्ताव मांडला आणि १९८३ मध्ये



UNESCO च्या आमसभेने त्याला मान्यता दिली.

**भारताचे स्थान :** भारतात सध्या ४३ UNESCO जागतिक वारसा स्थळे आहेत, ज्यात अजिंठा लेणी, वेरूळ लेणी, ताजमहाल, आणि आग्रा किल्ल्याचा समावेश आहे.

**वारसा म्हणजे काय?:** फक्त मालमत्ता नाही, तर पूर्वजांनी दिलेले गडकोट, मंदिरे, लेणी आणि नैसर्गिक वारसा जो आपण पुढच्या पिढीकडे सोपवतो.

हा दिवस आपल्या प्राचीन संस्कृती आणि नैसर्गिक संपत्तीचे महत्त्व अधोरेखित करतो. भारतातील अजिंठा, ताजमहाल, रायगड, लाल किल्ला, अशा असंख्य जागतिक वारसा स्थळाबद्दल देशी विदेशी पर्यटकांना आकर्षण असते. हजारो पर्यटक भेटी देऊन तेथील माहिती घेतात. तसेच वारसा जतन करून तो भावी पिढी पर्यंत नेण्याची जबाबदारी पार पाडावी लागते. या दृष्टीने जागतिक वारसा दिनाचे महत्त्व आहे. या निमित्ताने विविध प्रकारचे उपक्रम राबविले जातात.

**साहित्यिक, लेखकांना आवाहन**

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर ८३९०६७०९९९ या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.
त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**चौथा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मुंबई- ४०० ०३२**
**दिनांक: ०८.०४.२०२६**

**शुद्धीपत्रक**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६,**

**क्र. टिपीएस- २५२३/१०१७/प्र.क्र.१३९/२०२३/ईपी प्रसिध्दी/नवि- ३०:** ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३१(१) मधील तसेच या अनुषंगिक शासनास असलेल्या इतर अधिकारांचा वापर करुन मूर्तिजापूर नगरपरिषद प्रारुप विकास योजनेस शासन अधिसूचना क्र. टिपीएस-२५२३/१०१७/प्र.क्र.१३९/२०२३/वि.यो. भागशः मंजूरी/ नवि-३०, अन्वये दि.०४.०६.२०२५ रोजी भागशः मंजूरी मिळाली असून सारभूत फेरबदलांबाबतची पुनर्प्रसिध्द विकास योजना शासन सूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२५२३/१०१७/प्र.क्र.१३९/२०२३/ईपी प्रसिध्दी/नवि-३०, दि.०४.०६.२०२५ अन्वये जनतेकडून सूचना / हरकती मागविण्याकरीता प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त सूचनेतील परिशिष्ट- ब मधील सुचीमध्ये काही सुधारणा करणे आवश्यक आहे. त्यानुसार या शुध्दीपत्रकाद्वारे खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

**शुध्दीपत्रक**

शासन निर्णय क्र.टिपीएस-२५२३/१०१७/प्र.क्र.१३९/२०२३/ईपी प्रसिध्दी/नवि-३०, दि.०४.०६.२०२५ रोजीच्या अधिसूचनेसोबतच्या परिशिष्ठ- ब मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

| वगळलेला भाग | स्थान | आरक्षण क्र. | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ नुसार प्रसिद्ध विकास योजनेनुसारचा प्रस्ताव | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३० नुसार शासनास मंजुरीसाठी सादर विकास योजनेनुसार प्रस्ताव | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) नुसार मंजूर केलेला फेरबदल |
|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| EP-14 | Mouja Murtizapur Survey No. 10,11 | Site No. 25, 26, 27 | Site No.25, "Primary School and Playgroud" Site No.26, "Playground Site No.27, "Library" | Site No.25, "Primary School and Playgroud" Site No. 26, "Playground Site No. 27, "Library" | Site No.25, "Primary School and Playgroud" and Site No.26, are proposed to be deleted "Playground and included in resintial zone. Also area under the No. 27- "Library" and Site No. 26, "Playground" is proposed to be reserved newly as Site No. 27, "Primary School and Playground" |

| वगळलेला भाग | स्थान | आरक्षण क्र. | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ नुसार प्रसिद्ध विकास योजनेनुसारचा प्रस्ताव | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३० नुसार शासनास मंजुरीसाठी सादर विकास योजनेनुसारचा प्रस्ताव | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) नुसार मंजूर केलेला फेरबदल |
|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| EP-14 | Mouja Murtizapur Survey No. 10,11 | Site No. 25, 26, 27 | Site No.25, "Primary School and Playgroud" Site No.26, "Playground Site No.27, "Library" | Site No.25, "Primary School and Playgroud" Site No. 26, "Playground Site No. 27, "Library" | Site No.25, "Primary School and Playground" and part area of Site No.26, "Playground are proposed to be deleted and proposed to be included and residential zone Also area under the Site No. 27- "Library" and Site No. 26, "Playground" towards southern side of Site No. 27- "Library" is proposed to be reserved newly as Site No. 27, "Primary School and Playground" as shown on the plan. |

सदरची सुचना महाराष्ट्र शासनाचे www.maharastra.gov.in (कायदे व नियम) या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशाने व नावाने,**

**(प्रसाद रा. शिंदे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**वि.मा.का./अम./६६/२०२५-२०२६**

## अग्रवाल समाजाच्या महिलांचा गरजूंना मोफत घागर वितरण उपक्रम

**अकोला:** सामाजिक सेवाभावी कार्यात सदा सक्रिय असणाऱ्या अग्रनारी प्रांतीय महिला असो. अग्रवाल महिला मंडळ तथा अ भा अग्रवाल महासभाच्या महिला पदाधिकाऱ्यांनी गरजू महिलांना मोफत पाण्याच्या घागरी व पादत्राणे वितरित केलीत.स्थानीय रामदेवबाबा-श्यामबाबा मंदिर परिसरात शनिवारी आयोजित या घागर वितरण कार्यक्रमात गरजू महिलांनी एकच गर्दी करीत या उपक्रमाच्या लाभ घेतला.भीषण व गर्मीचा उच्चांक गाठणाऱ्या या उन्हाळ्यात पाण्याचे दुर्भिक्ष व उन्हाची काहिली बघता हा उपक्रम साकार करण्यात आला. या मोफत घागर व पादत्राणे वितरणाचा प्रारंभ अग्रनारी प्रांतीय महिला असो.च्या शाखाध्यक्ष लता खिरवाल, मंत्री उमा झुनझुनवाला, अग्रवाल महिला मंडळाच्या अध्यक्ष निशा लोहिया, सचिव मीना बाजोरिया, दर्शना गोयनका, ममता खेतान, सीमा शाह, शीतल गर्ग तथा अग्रवाल महासभाच्या प्रदेश पदाधिकारी ममता अग्रवाल, जिल्हाध्यक्ष संगीता अग्रवाल, तथा सल्लागार सौ शोभा गोयनका, चंद्रकला अग्रवाल, डॉ ममता ज अग्रवाल यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

## हिंदु स्मशानभूमीची स्वच्छता



**अकोला:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त तसेच आमदार रणधीरभाऊ सावरकर यांच्या वाढदिवसाच्या औचित्याने सुरू झालेल्या 'माझा प्रभाग स्वच्छ प्रभाग' या मोहिमे अंतर्गत प्रभाग क्रमांक ०९ मध्ये असलेले हिंदू स्मशान भूमी स्वच्छता करण्यात आली.

यावेळी स्मशान भूमी स्वच्छता करून नागरिकांन मद्ये स्वच्छते बाबत जनजागृती करण्यात आली. या वेळी सिद्धार्थ शर्मा, महिला आघाडी अध्यक्ष वैशालीताई शेळके, राहुल धोटे, नितीन ताकवाले, तुषार भिरड, सतीश ढगे, निलेश निनोरे, शाम विंचणकर, ज्योती मानकर, हर्षल चौधरी, वसंत मानकर, सूरज शेळके व मोठया संख्येत कार्यकर्ते उपस्थित होते.

## आपादग्रस्त कुटुंबांना रेडक्रॉस च्या वतीने जीवनावश्यक साहित्य किट वितरण

**अकोला:** आपादग्रस्त कुटुंबांना मानवीय दृष्टिकोनातून सहकार्य करण्याची आपली परंपरा रेडक्रॉस सोसायटीने कायम ठेवीत अशा कुटुंबातील घटकांना जीवनावश्यक साहित्याची किट वितरित करीत आपले सामाजिक दायित्व जोपासले. रेडक्रॉसच्या वतीने इंडियन सोशल अँड रिसर्च फाउंडेशनचे सचिव संदीप पुंडकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य चंद्रशेखर खेडकर, एड सुभाषसिंह ठाकुर यांच्या हस्ते आपादग्रस्त कुटुंबांना जीवनावश्यक साहित्य किट वितरण करण्यात आले.तत्कालीन जिल्हाधिकारी निमा अरोरा यांच्या सूचनेनुसार

जि.प.च्या माध्यमातून कोविड काळातील आपादग्रस्त कुटुंबाची सेवा आपणास करता आली असे उदगार रेडक्रॉसच्या कार्यकारी सदस्या अरुधंतीताई शिरसाट यांनी व्यक्त केले.

## निधन वार्ता

### श्रीराम कोकाटे



**अकोला:** येथील मोठ्या उमरीतील डवले महाविद्यालय समोर राहणारे श्रीराम राघोजी कोकाटे (८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात मोठा आप्त परिवार आहे.

# वाटसरूंची तहान भागवणाऱ्या शहरातील पाणपोया झाल्या लुप्त !

## ◆ जारच्या पाण्याने घेतली पानपोईची जागा





प्रतिनिधी १८ एप्रिल

अकोला: सध्या अकोला शहर संपूर्ण राज्यात तापमानाच्या बाबतीत नंबर एक वर पोहोचले आहे. जिल्ह्यात सूर्य आग ओकत असताना व उन्हाची तीव्रता वाढली असताना तहानलेल्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी उभारलेल्या शहरातील अनेक पाणपोया मात्र बंद अवस्थेत असल्याचे चित्र समोर आले आहे. कडक उन्हातही पिण्याच्या पाण्याची सोय नसल्यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत असून या पाणपोया तातडीने सुरू कराव्यात अशी मागणी होत आहे.

अकोला शहरात विविध ठिकाणी उन्हातान्हाने त्रस्त झालेल्यांना मोफत पाणी मिळावे या उद्देशाने पाणपोया उभारण्यात आल्या होत्या. मात्र सध्या त्यापैकी बहुतांश पाणपोया बंद पडल्या असून त्यांची योग्य देखभाल होत नसल्याचे दिसून येत आहे. हजारो रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या या पाणपोया बंद असतानाच त्या ठिकाणी जाहिराती तसेच फेरीवाल्यांचे अतिक्रमण झाल्याचेही आढळून आले आहे.

नवीन बस स्थानका समोर पानपोयी उभारण्यात आली आहे परंतु त्या ठिकाणी अद्यापही माठ व पाण्याची व्यवस्था नसल्याचे दिसून येत आहे. जुने बस स्टॅन्ड, जिल्हा महिला रुग्णालय, सर्वोपचार रुग्णालय, तहसील कार्यालय, जनता भाजी बाजार, राणी सती मंदिरासमोर, वसंत टॉकीज जवळील जैन मंदिरासमोर उभारण्यात आलेल्या पाणपोई देखील दुर्लक्षामुळे जीर्ण अवस्थेत असल्याचे दिसून येते. जनता भाजी बाजार परिसरातील पाणपोईच्या परिसरात फेरीवाल्यांनी अतिक्रमण करून भाजीपाला ठेवण्यासाठी जागा तयार केली असल्याचे नागरिकांनी सांगितले. त्यामुळे ही पाणपोई पुन्हा सुरू करून परिसर स्वच्छ करण्याची मागणी होत आहे. अकोला बसस्थानक, रेल्वे स्थानक परिसर, आदी वर्दळीच्या ठिकाणी मोठ्या पाणपोया उभारण्यात आल्या आहेत. मात्र सध्या या सर्व पाणपोया बंद असल्याने त्या केवळ अशाच उभ्या आहेत. उन्हाच्या तीव्रतेत बाहेरून येणाऱ्या नागरिकांनाही पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याने अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे शहरातील मुख्य ठिकाणी पाणपोया तातडीने सुरू कराव्यात अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

पानपोई ची जागा घेतली जार च्या पाण्याने शहरातील पानपोयांची जागा आता जारच्या थंड पाण्याने घेतली आहे. शहरातील काही दुकानदार व दानशूर व्यक्ती आपल्या प्रतिष्ठानासमोर किंवा घरासमोर पाण्याच्या कॅन भरून ठेवत आहेत त्यामुळे काही प्रमाणात वाटसरूंची तहान भागत आहे अलीकडच्या काळामध्ये पाण्याचा व्यापार सुरू झाल्याने जार व बॉटल बंद पाण्याच्या जमान्यात पाणपोई लुप्त होत चालल्या आहेत. या जारच्या पाण्याला माठाच्या पाण्याची सर येत नसल्याने वाटसरूंना नाईलाजाने हे पाणी पिऊन आपली तहान भागवावी लागत आहे





## महिलेवर अत्याचार करणाऱ्या आरोपीचा जमानत अर्ज न्यायालयाने फेटाळला

प्रतिनिधी १८ एप्रिल

**अकोट:** १७.०४.२०२६ रोजी येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश बी.एम. पाटील यांनी तेल्हारा पोलीस स्टेशन अंतर्गत एका गुन्ह्याचा आरोपी सरदार खान सत्तार खान ४६ वर्षे राहणार रा. दहीगांव याचा जामीन अर्ज फेटाळला.

या आरोपीने हिंदू महिलेशी प्रेमसंबंध निर्माण केले. लग्नाचे आमिष दाखवुन फोटो व व्हीडिओ व्हायरल करण्याची धमकी देवुन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे प्रकरणात दाखल केलेला जमानत अर्ज फेटाळला आहे. आरोपी दि.१०.०४.२०२६ पासुन अकोला कारागृहात आहे.

या प्रकरणात सरकारी वकील अजित देशमुख यांनी युक्तीवाद केला की, पिडीतीने १३.०२.२६ रोजी पो.स्टे. तेल्हारा येथे फिर्याद दिली की,



फिर्यादीचे २००१ ला लग्न झाले होते परंतु २०१५ मधे फिर्यादीचे पती मरण पावल्यानंतर ती तेव्हा लहान मुलाबाळासाह दहीगांव अवताडे येथे असताना त्यांच्या घराजवळ असणारा सरदार खान सत्तार खान याचेसोबत फिर्यादीची ओळख झाली. व काही दिवसांनी त्या दोघांमधे प्रेमसंबंध निर्माण झाले. आरोपीने फिर्यादीला सांगितले की, तो त्याच्या पत्नीला तलाक देणार आहे आणि फिर्यादीसोबत लग्न करणार आहे. असे म्हणुन आरोपीने दहीगाव येथील येथील गंगाळ यांचे चक्कीच्या मागे रात्रीच्या वेळी शारीरीक संबंध ठेवले परंतु फिर्यादीसोबत लग्नास नकार दिला. फिर्यादीने तिच्या आईला ही घटना सांगितली. तेव्हा फिर्यादीच्या आईने आरोपीला विचारले असाता त्याने वाद घातला व फिर्यादीसोबत लग्न करण्यास नकार दिला. म्हणुन बदनामीच्या भितीने वडीलांची सर्व प्रापर्टी विकुन दहीगांव येथुन पिंपळगाव बसवंत ता. निफाड़ जि. नाशीक येथे राहण्यासाठी गेले. त्यानंतर २०२५ फिर्यादीला सरदर खान याने फिर्यादीला लग्न करतो असे म्हटले व तेव्हा फिर्यादीने नाही म्हटले असता बदनामी करण्याची धमकी दिली. नोव्हेंबर मधे सरदार खान याने फोन केला व फिर्यादीसोबत लग्न करायचे म्हणून तो पिंपळगाव बसवंत ता.निफाड येथे आला आणि त्याने गाडीत बसवुन अंबिकानगर धुळे येथे फिर्यादीला घेवुन गेला. आणि वारंवार शारीरिक संबंध ठेवले. आणि शारीरीक संबंध निर्माण करताना फिर्यादीचे फोटो व्हीडीओ सुध्दा काढले. तसेच तो फिर्यादीला जबरदस्तीने मटन खाण्यास सांगत होता व न खाल्यास मारहाण करीता होता. ३१.१२.२५ रोजी अंबिका नगर येथे असतांना सरदार खान याने त्याचा मित्र अफरोज खान याला घेवुन आला व त्याचेसोबत सुध्दा फिर्यादीला जबरदस्तीने शारीरीक संबंध ठेवायला लावले. त्याला काही न सांगता रोकडीया नगर शेगाव येथे निघुन आली. त्यानंतर ०६.०२.२६ रोजी सरदार खान शेगाव येथे आला व फिर्यादीला धमकी दिली. गुन्ह्याचा तपास उपनिरीक्षक भटकर करीत आहेत. सरकार पक्ष अशा महिला अत्याचार संबंधी गंभीर प्रकरणात आरोपीचा जमानत अर्ज नामंजूर करावा असा युक्तीवाद सरकारी वकील अजित देशमूख यांनी न्यायालयात केला तसेच सरकार पक्षाला ॲड. रविश कुलकर्णी यांनी सहकार्य केले.

## वारखेड परिसरातील वाघ आता वारीच्या मानवी वस्तीत

प्रतिनिधी १८ एप्रिल

**हिवरखेड:** वारखेड परिसरातील वाघ फटाके फोडून हुसकल्यानंतर आता वारीच्या मानवी वस्तीत शिरला असून वाघाने एका गाढवाची निर्दयी शिकार केली आहे. ही घटना १८ एप्रिल रोजी पहाटे उघड झाली. सुरुवातीला शेत शिवारात धुमाकूळ घालून अनेक शिकारी करणाऱ्या वाघाची मजल आता मानवी वस्तीपर्यंत पोहोचली आहे. जोपर्यंत हा वाघ मानवी बळी करत नाही तोपर्यंत वन विभाग अधिकाऱ्यांची झोप उडणार नसल्याची चिन्हे आहेत.



स्थानिक वनाधिकाऱ्यांनी प्रस्ताव पाठवून सुद्धा वरिष्ठ वन अधिकाऱ्यांकडून अद्याप पिंजरा लावून वाघाला रेस्क्यू केल्या गेले नाही. त्यामुळे वाघाने किती नरबळी घेण्याची वाट वन विभागाचे वरिष्ठ अधिकारी पाहत आहेत असा संतप्त सवाल घाबरलेल्या नागरिकांमधून होत आहे.

## श्रीमद् भागवत कथा सप्ताह उत्साहात संपन्न

प्रतिनिधी १८ एप्रिल

**बाळापुर:** येथील श्री हनुमान मंदिर कासारखेड या ठिकाणी श्रीमद् भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात संपन्न झाला. मंगळवारी भागवताचार्य पुरुषोत्तम महाराज काटकर मांडवा यांच्या भागवत सप्ताहाचा भक्तांनी लाभ घेतला. सात दिवस महेश महाराज मारवाडी बिर्ला खुर्द, हरिदास महाराज ढोरे शिवापूर, एकनाथ महाराज खांदे खामगाव, किशोर महाराज काळे तामसी, अक्षदाताई भेंडी गायगाव, गजानन महाराज दहीकर वरवट बकाल, यशवंत महाराज धोत्रे विवरा. काल्याचे किर्तन पुरुषोत्तम महाराज काटकर यांनी



केले.

कीर्तनकारांनी कीर्तन रुपी सेवा हनुमानजी चरणी व भगवान श्रीकृष्ण यांच्या श्रीमद् भागवत कथा धर्म मंडपात समर्पित केली. सातही दिवस संपूर्ण कासारखेर परिसर भक्तीमय होता.

व्यासपीठ नेतृत्व यशवंत महाराज धोत्रे विवरा यांनी केले. गायनाचार्य सदानंद महाराज निकम, पांडुरंग महाराज गोळे, सोपान महाराज निकम, मधुकर महाराज कोकाटे, दिलीप महाराज गोळे, एकनाथ महाराज कोकाटे वरुड गव्हाण व बाळापूर मांडवा धनेगाव सांगवी सातारगाव या परिसरातील टाळकरी मंडळींनी सेवा समर्पित केली. पांडुरंग रोकडे, महादेव विधाते, देवीदास गोमासे, कोकाटे, नंदकिशोर जामोदे, विलास कलोरे, विष्णुपंत गायकवाड यांनी सात दिवस सेवा दिली.

## रुईखेड येथे शॉर्ट सर्किट मुळे संत्र्याची झाडे व ठिबक सिंचन साहित्याची राख रांगोळी

प्रतिनिधी १८ एप्रिल

**अकोट:** रुईखेड परिसरातील शेतशिवारात शॉर्टसर्किटमुळे आगीचे सत्र थांबण्याचे नाव घेत नाही. तोवर सलग दुसऱ्या दिवशीही संत्रा बागांना आग लागून गहू पीक, ठिबक नळ्या, पीव्हीसी पाईप आणि झाडांचे मोठे नुकसान झाले. गट नंबर( ३६९ )मधील शेतात मंगळवार १४ एप्रिल रोजी भास्कर शेंडे यांच्या शेतातील संत्राच्या उभ्या फटामधील कापलेल्या गव्हाच्या गवत काळ्यांनी पेट घेतल्याने आजीने फिटनेस वेग घेतला आगीची घटना ताजी असतानाच १५ एप्रिलला दादाराव गव्हाळे यांच्या शेतातही शॉर्टसर्किटमुळे भीषण आग लागली. महावितरणच्या पॉवर हाऊसजवळच ही घटना घडल्याने



प्रशासनाच्या दुर्लक्षावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, रुईखेड-फाटा मार्गावर धावत्या मोटारसायकलने अचानक पेट घेतल्याची धक्कादायक घटना घडली. सुदैवाने जीवितहानी टळली, मात्र वाहन पूर्णपणे जळून खाक झाले. पटवारी किशोर पांडे यांनी नुकसान पंचनामा अंदाजे तीन लाख रुपये सादर केला आहे व फणस महावितरण सहाय्यक अभियंता वीरेंद्र काळपांडे यांनी शेतात स्वतः जाऊन पाहणी केली या सलग घटनांमुळे शेतकऱ्यांमध्ये मोठी भीतीचे वातावरण दहशत तयार झाली आहे महावितरणने तात्काळ उपायोजना करावी तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सर्वे व पंचनामा करून सरसगड भरपाई देण्यात यावी अशी सर्व शेतकरी व गावकऱ्यांची मागणी होत आहे.

'अत्यल्प भूधारक असून रोजगार हमी योजनेतून उभी केलेली संत्रा बाग आगीत जळाली. शासनाने तातडीने पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी.'
**दादाराव गव्हाळे**
(शेतकरी, रुईखेड)

'आंबिया बहारात असलेली संत्रा बाग शॉर्टसर्किटमुळे उद्धवस्त झाली. संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरित सर्व्हे करून मदत करावी.'
**भास्कर शेंडे**
(संत्रा शेतकरी रुईखेड)

या प्रकरणाची कोणतीच तक्रार दाखल झाली नव्हती, पाहणी केली आहे आग नेमकी कशाने लागली हे वरिष्ठ विद्युत निरीक्षक अहवालात स्पष्ट होईल,
**वीरेंद्र काळपांडे**
(पणज वितरण सहाय्यक अभियंता)

## जाजू नगर रेल्वे गेट परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

प्रतिनिधी १८ एप्रिल

**अकोला:** डाबकीरोड वरील जाजूनगर परिसरात सावित्रीबाई फुले महिला मंडळ तर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती जल्लोषात साजरी करण्यात आली. युवकांनी बाईक रॅली काढून जय भीम च्या घोषणांनी जाजू नगर दुमदुमून गेले होते. यावेळी प्रमुख पाहुणे नगरसेवक आकाश कवडे, त्यांच्या पत्नी निकिता कवडे, नगरसेवक मनोज पाटील, सरोदेताई नगरसेविका, बीजेपी सभापती राहुल धोटे, नगरसेविका क्षीरसागरताई यांची उपस्थिती



होती. संस्था अध्यक्ष रंजनाताई शिरसाट, उपाध्यक्ष रूपालीताई वानखडे, सचिव विजय भोजने, कोषाध्यक्ष अंजूताई तेलगोटे, सहसचिव शितलताई जंजाळ, सदस्य लक्ष्मीताई गजभार, हिवराळेताई, ज्योतीताई भोजने, दीक्षाताई भोजने, शीलाताई गवई, जयाताई वानखडे, स्वाती दामोदर, उमाळे बाई, मनीषा खंडारे, सुजाता खंडारे, वंदनाताई शिरसाट, साधनाबाई शेगोकार, माजी सैनिक राजेंद्र तेलगोटे, रवींद्र शिरसाट, प्रमोद वानखडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन माजी सैनिक अरविंद जंजाळ व राजेश तायडे यांनी केली आभार भोजने काका व रमेशभाऊ गजभार यांनी मानले.

## जुने शहर भागात आपत्कालीन भारनियमन सुरू

प्रतिनिधी १८ एप्रिल

**अकोला :** शुक्रवार सायंकाळी जुन्या शहरातील अगरवेस, गुलजार पुरा भागातील वीज पुरवठा खंडीत झाला. ग्राहकांनी अर्धा तास वाट बघून ऑनलाइन तक्रार नोंदवण्यासाठी फोन केला असता, महावितरण कंपनीच्या सर्व्हर मधे बिघाड झाल्याने तक्रार नोंदवता आली नाही. वीज पुरवठा खंडीत होण्याचे कारण जाणून घेण्यासाठी अकोला सर्कल ऑफिस कंट्रोल रूम ला फोन केला असता, कार्यरत कर्मचाऱ्याने आपत्कालीन भारनियमन राबविण्यात येत असल्याचे सांगितले. भारनियमन किती वेळ राहील याची विचारणा केली असता, सांगता येणार नाही असे उत्तर दिले. चौकशी केली असता, महानगरातील इतर कोणत्याही भागात आपत्कालीन भारनियमन राबविण्यात आले नाही. तब्बल पाऊण तास आपत्कालीन भारनियमनाचा चटका वीज ग्राहकांना सहन करावा लागला. दिवस आणि रात्रीच्या तापमानात भयंकर वाढ झाली असतांना, फक्त जुन्या शहरातील याच भागात जाणीवपूर्वक आपत्कालीन भारनियमन राबविण्यात आले का? तसेच या भागात माणसं राहतात याचा विसर महावितरण कंपनीला पडला का? असा प्रश्न जुन्या शहरातील वीज ग्राहकांना भेडसावत आहे.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ 5226
मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व
स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय
गायत्री नगर. अकोला
आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!
वैशिष्ट्ये :
- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा

इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
- इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार



पत्ता : मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790,9960437366

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शनिवार, दि. १८ एप्रिल २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# चिमुकलीवर अत्याचार; नराधमाला आजीवन कारावास

प्रतिनिधी १८ एप्रिल

**यवतमाळ** : अवघ्या सहा वर्षांच्या निष्पाप बालिकेवर बलात्कार करून तिला जीवे मारण्याचा क्रूर प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अतिरिक्त सत्र न्यायाधीश, केळापूर यांच्या न्यायालयाने आजीवन कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.

मारोती मधुकर भेंडाळे (वय ३३, रा. पहापळ, ता. मारेगाव) असे आरोपीचे नाव आहे.

न्यायालयाने आरोपीला भारतीय दंड संहितेच्या कलम ३०७, ३६३, ३६६, ३७६(अब) आणि बाल लैंगिक शोषण प्रतिबंधक कायद्याच्या कलम ४, ६, ८ अंतर्गत दोषी ठरवले. कलम ३७६(अब) व कलम ३०७ अंतर्गत आजीवन कारावास (नैसर्गिक मृत्यूपर्यंत), तर इतर कलमांनुसार ७ ते १० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावण्यात आली. सर्व शिक्षांबरोबर दंडही ठोठावला असून, दंड न भरल्यास अतिरिक्त कारावासाची तरतूद करण्यात आली. दंडाची रक्कम पीडितेला देण्याचे आदेश देण्यात आले

### शिक्षेचा तपशील

- कलम ३६३ — ७ वर्षे सक्तमजुरी + ५,००० रुपये दंड
- कलम ३६६ — १० वर्षे सक्तमजुरी + ५,००० रुपये दंड
- कलम ३७६ — १० वर्षे सक्तमजुरी + ५,००० रुपये दंड
- कलम ३७६(अब) — आजीवन कारावास + १०,००० रुपये दंड
- कलम ३०७ — आजीवन कारावास + १०,००० रुपये दंड



आहेत. सर्व सजा एकत्रित भोगाव्या लागणार आहेत.

९ मे २०२२ रोजी संध्याकाळी साडेसातच्या सुमारास पहापळ येथील हळदीच्या कार्यक्रमादरम्यान पीडितेची आजी तिला घराजवळच्या शेतात संडासला घेऊन गेली होती. परत आल्यावर मुलगी गायब असल्याचे लक्षात आले. रात्री उशिरापर्यंत शोध घेतल्यानंतरही ती सापडली नाही. त्यानंतर पीडितेच्या वडिलांनी मारेगाव पोलीस स्टेशनमध्ये रिपोर्ट दाखल केला (अपराध क्र. १६२/२०२२).

दुसऱ्या दिवशी पहाटे पीडिता चिलाटीच्या काट्यांमध्ये गंभीर जखमी अवस्थेत सापडली. तिच्या संपूर्ण शरीरात काटे रुतले होते. तिला प्रथम खाजगी दवाखान्यात, नंतर वणी ग्रामीण रुग्णालयात व शेवटी यवतमाळ सरकारी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. घटनेच्या वेळी पीडितेचे वय अवघे ५ वर्षे ८ महिने होते. विश्वासात घेतल्यानंतर पीडितेने सांगितले की, आरोपी मारोती भेंडाळे तिच्याजवळ आला, तोंड दाबून तिला अंधारात घेऊन गेला. अत्याचार करुन तिला उचलून काट्यांमध्ये फेकून दिले. पीडिता बेशुद्ध झाली होती. पहाटे शुद्धीवर आल्यानंतर ती 'आजी-आजी' म्हणून ओरडल्याने गावकऱ्यांना ती सापडली.

### तपास व खटला

- मारेगाव पोलीस स्टेशनचे इनचार्ज राजेश अशोकराव पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी संजय गंगाराम पुजलवार व प्राथमिक तपास अधिकारी माया मारोती चाटसे यांनी घटनास्थळ पंचनामा, वैद्यकीय तपासणी व पुरावे गोळा केले. खटला अतिरिक्त सत्र न्यायाधीश १, केळापूर ए. एम. देशमुख यांच्या न्यायालयात चालला. यात १७ साक्षीदार तपासण्यात आले. पीडिता, तिची आई व वैद्यकीय अधिकारी यांच्या साक्षी महत्त्वाच्या ठरल्या. सरकारी पक्षातर्फे जिल्हा सरकारी वकील श्रीमती नीति दवे यांनी खटला प्रभावीपणे चालवला.

# फार्महाऊसमध्ये जुगार अड्ड्यावर धाड

## ९.८७ लाखांचा मुद्देमाल जप्त, १६ जण ताब्यात

प्रतिनिधी १८ एप्रिल

**यवतमाळ** : जिल्ह्यातील उमरखेड शेतशिवारातील फार्महाऊसमध्ये सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेने धाड टाकत ९ लाख ८७ हजार ४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत १६ जणांना ताब्यात घेण्यात आले असून, काही जण पोलिसांची चाहूल लागताच पळून गेले.

सुरज जोगींदर गुप्ता (35), रा. बाळदी ता. उमरखेड, नितेश क्रिष्णा राठोड (26) रा. दत्तबडी ता. हादगांव जिल्हा नांदेड, ग्यानबा किसन चिकणे (29) रा. टेंभी ता. महागांव जि. यवतमाळ, टिकाराम उमाजी चव्हाण (38) रा. दत्तवर्डी ता. हादगांव जिल्हा नांदेड, सय्यद रसुल सय्यद मुसा (51) रा. रोहोलेपुरा उमरखेड, संतोष सुर्यभान जोगदंड (40) रा. चिलगव्हाण ता. उमरखेड, मणोहर दत्तराव जाधव (39) रा. पोळी ता. हदगांव जि. नांदेड, से. सोहल अली (39) रा. तिवरठा ता. जि. नांदेड, से. पाशु से. रहिमोद्दीन वय २८ रा. देगलुर फाटा नांदेड ता.जि. नांदेड, शिवाजी केशवराव कदम (37) रा. बैसा ता. जि. नांदेड, अशोक नारायण शिंदे (24) रा. मिरकस वाडी ता. मुदखेड जि. नांदेड, शेख शहबाज शेख रफीक (36) रा. खडकपुरा ता.जि. नांदेड, शेख रमजान शेख फरीद (32) रा. राजेंद्रप्रसाद वार्ड उमरखेड, शेख बादशहा शेख हुसेन (60) रा. राणी धानोरा ता. आर्णी जि. यवतमाळ, नारायण भिमराव चव्हाण (45) रा. हिंगोली नाका तान्हाजी नगर नांदेड ता.जि. नांदेड, शरद भारत राठोड (40) रा. ढाणकी ता. उमरखेड जि. यवतमाळ अशी जुगार खेळणा-यांची नावे आहे. यवतमाळ जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर आळा घालण्याच्या उद्देशाने पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेला विशेष सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार, उमरखेड पोलिस ठाणे हद्दीतील एका शेतातील फार्महाऊसमध्ये हारजितचा जुगार सुरू असल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली. या माहितीनुसार पथकाने तात्काळ घटनास्थळी धाड टाकली. कारवाईदरम्यान आरोपींकडून ८ लाख २ हजार ४० रुपये रोख रक्कम, १० मोबाईल (किंमत ६५ हजार रुपये) आणि ८ मोटारसायकली (किंमत १ लाख २० हजार रुपये) असा एकूण ९ लाख ८७ हजार ४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ताब्यात घेतलेल्या आरोपींविरुद्ध उमरखेड पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू असून, पुढील तपासासाठी आरोपी व मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सतीश चवरे व त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# मतदार पुनर्निरीक्षणाबाबत जनजागृतीची गरज : संदीप रत्नपारखी

प्रतिनिधी १८ एप्रिल

**दिग्रस** : भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनर्निरीक्षण (SIR) कार्यक्रमाबाबत मतदारांमध्ये निर्माण झालेला संभ्रम दूर करण्यासाठी व्यापक जनजागृतीची गरज असल्याचे मत शिवसेना उपशहर प्रमुख संदीप रत्नपारखी यांनी व्यक्त केले.



या प्रक्रियेची पुरेशी माहिती नसल्यामुळे अनेक नागरिक गोंधळात पडत असून, मॅपिंग, आवश्यक कागदपत्रे आणि पडताळणी प्रक्रियेबाबत स्पष्टता नसल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे प्रशासनाने अधिक प्रभावीपणे माहिती पोहोचविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांनीही आपली जबाबदारी ओळखून पारदर्शक व प्रामाणिकपणे काम करणे गरजेचे आहे. प्रत्येक मतदाराची अचूक नोंद होण्यासाठी विशेष दक्षता घ्यावी, असेही त्यांनी म्हटले. तसेच मतदारांनी प्रशासनास सहकार्य करत आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर करावीत व आपल्या नावाची खातरजमा करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले.

लोकशाही बळकट करण्यासाठी अचूक मतदार यादी आवश्यक असून, या प्रक्रियेत सर्वांनी सकारात्मक सहभाग नोंदवावा, असेही रत्नपारखी यांनी स्पष्ट केले.

# माथार्जुन ग्रामपंचायत: सरपंचपदासाठी तिरंगी लढत

प्रतिनिधी १८ एप्रिल

**झरी जामणी** : ग्रामपंचायत माथार्जुन येथील थेट सरपंच पदाच्या पोटनिवडणुकीने आता चुरशीचा रंग घेतला आहे. निवडणूक प्रक्रियेला ७ एप्रिल २०२६ पासून सुरुवात झाली असून १३ एप्रिल रोजी एकूण चार उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. मात्र १५ एप्रिल रोजी झालेल्या छाननीत भागीरथा शंकर आत्राम यांचा अर्ज अपात्र ठरविण्यात आला. त्यामुळे तीन उमेदवारांचे अर्ज वैध ठरले असून सरपंचपदासाठी तिरंगी लढत निश्चित झाली आहे. निर्मला जपलत कुमरे, प्रेमिला पुडलिक मेश्राम, उज्वला संतोष तुमराम यांच्यात सरपंच पदासाठी थेट मुकाबला होणार आहे. गावात निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापले असून तिन्ही उमेदवारांनी प्रचाराला वेग दिला आहे. या चुरशीच्या लढतीकडे संपूर्ण ग्रामस्थांचे लक्ष लागले असून पुढील राजकीय घडामोडींकडे सर्वांचेच लक्ष केंद्रित झाले आहे.

# प्रेमाच्या जाळ्यात ओढून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

## २० वर्षीय तरुणाला अटक

प्रतिनिधी १८ एप्रिल

**आर्णी** : आर्णी तालुक्यातील एका गावातील १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या नावाखाली जाळ्यात ओढून तिच्यावर वारंवार जबरदस्तीने अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आई-वडिलांना ही बाब समजताच त्यांनी मुलीला घेऊन थेट आर्णी ठाण्यात धाव घेतली. पिडितेच्या जबानीनुसार पोलिसांनी आरोपीविरुद्ध तत्काळ गुन्हा दाखल केला आणि काल रात्रीच त्याला अटक करण्यात आली.



अल्पवयीन मुलगी २०२४ मध्ये आर्णी येथील एका शाळेत नववीत शिकत होती. त्यावेळी गांधीनगर भागातील शेख सिराज शेख दिलदार (वय २०) हा तिच्या मागेपुढे फिरत होता. ओळख वाढल्यानंतर दोघे आर्णी बसस्थानकावर नियमित भेटू लागले. सिराजने गोड बोलण्यातून प्रेमसंबंध वाढवले आणि एके दिवशी आपल्या घरी कोणी नसताना मुलीला घरी नेले. तेथे त्याने तिच्यावर अत्याचार केला.

नंतर मुलीने दहावी उत्तीर्ण केल्यानंतर यवतमाळ येथील पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये प्रवेश घेतला आणि तिथे रूम घेऊन राहायला सुरुवात केली. मात्र सिराज तिथेही तिच्या मागे लागला आणि दोन वेळा अत्याचार केला. ही सर्व बाब आई-वडिलांना समजल्यावर मुलगी घाबरली आणि तिने सर्व आपबिती सांगितली.

> या प्रकरणात लव्ह जिहादचा घटक असू शकतो, अशी चर्चा आर्णी शहरात रंगली आहे. पोलिस प्रशासनाने या बाबतीत सखोल चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

१२ एप्रिलला संध्याकाळी अल्पवयीन मुलगी आई-वडिलांसोबत आर्णी ठाण्यात आली आणि शेख सिराज शेख दिलदारविरुद्ध तक्रार दाखल केली. आर्णी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ६४(२)(i)(m) तसेच पोक्सो कायद्याच्या कलम ४ अंतर्गत गुन्हा नोंदवला. रात्रीच सिराजला अटक करण्यात आली.

आज आरोपीला न्यायालयात हजर करण्यात आले. पोलिसांनी त्याच्या पोलिस कोठडीची मागणी केली आहे. या प्रकरणाचा तपास ठाणेदार नीलेश सुरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक मिलिंद पारडकर, विजय चव्हाण आणि महिला पोलिस कर्मचारी करत आहेत.

# पळशी शिवारात बिबट्याची दहशत; वासरु ठार

प्रतिनिधी १८ एप्रिल

**उमरखेड** : तालुक्यातील पळशी शिवारात बिबट्याच्या हल्ल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नागापूर येथील शेतकरी डॉ. ज्ञानेश्वर श्रीराम कदम यांच्या शेतातील तीन वर्षांचे वासरू बिबट्याने ठार केल्याची घटना १० एप्रिल रोजी पाराबती शेतात घडली.



मृत वासराची किंमत अंदाजे १५ ते २० हजार रुपये असून, या घटनेमुळे परिसरातील शेतकरी भयभीत झाले आहेत. शेतीची कामे करण्यासाठी शेतात जाणे आवश्यक असतानाच बिबट्याच्या वावरामुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढली आहे.

घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे सहाय्यक वनक्षेत्र अधिकारी चक्रधर जाधव व वनरक्षक केंद्रे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा व पाहणी केली. संबंधित वासराचे शवविच्छेदनही करण्यात आले आहे.

दरम्यान, नुकसानग्रस्त शेतकरी डॉ. ज्ञानेश्वर कदम (रा. नागापूर) यांना तात्काळ आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# नगरसेवकाकडून अपंग व्यक्तीस तीन चाकी सायकल भेट

प्रतिनिधी १८ एप्रिल

**उमरखेड** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असताना, नगरसेवक अमोल तिवरंगकर यांनी सामाजिक बांधिलकी जपत एका अपंग व्यक्तीस तीन चाकी सायकल भेट देत मानवतेचा आदर्श घालून दिला.

१४ एप्रिल रोजी साजऱ्या झालेल्या डॉ. आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम राबविण्यात आला. गरजू अपंग व्यक्तीस सायकल प्रदान करून



त्याला स्वावलंबी जीवन जगण्यासाठी मदतीचा हात देण्यात आला. सायकल मिळाल्यानंतर लाभार्थ्याच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद उपस्थितांना भावूक करून गेला. यावेळी आमदार किसन वानखेडे, भाजपा जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, नगरसेवक गोपाल कलाने, रोहित वर्मा, विक्रम राठोड, बिरजू मुडे, अरविंद धबडगे, बबलू मैड, डॉ. प्रतिक रुडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सध्या दिखाऊ पद्धतीने कार्यक्रम साजरे करण्याची प्रवृत्ती वाढत असताना, अमोल तिवरंगकर यांनी साधेपणाने गरजूंना मदत करण्याचा मार्ग स्वीकारत समाजासमोर आदर्श ठेवला. त्यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# फुलसावंगी येथे मोफत नेत्रतपासणी शिबिर; शेकडो रुग्णांची तपासणी

प्रतिनिधी १७ एप्रिल

**फुलसावंगी** : जिया मेमोरियल फाउंडेशनच्या वतीने आयोजित भव्य मोफत डोळे तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराला गुरुवारी (दि. १६ एप्रिल) परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दिवसभरात शेकडो रुग्णांची तपासणी करून अनेकांना दिलासा देण्यात आला.

ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांसाठी वरदान ठरलेल्या या शिबिरात लहान मुले, महिला, शेतकरी व ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विदर्भातील अनुभवी नेत्रतज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने अत्याधुनिक यंत्रसामग्रीच्या साहाय्याने रुग्णांची सखोल तपासणी केली.

या वेळी मोतीबिंदू, दृष्टीदोष,



डोळ्यांची जळजळ, पाणी येणे आदी विकारांचे निदान करण्यात आले. गंभीर रुग्णांची नोंद करून त्यांच्यावर मोफत शस्त्रक्रियेसाठी पुढील प्रक्रिया सुरू करण्यात आली. काही रुग्णांना तत्काळ औषधोपचार देण्यात आले, तर गरजूंना मोफत चष्म्यांसाठी नोंद करण्यात आली.

तसेच पुढील उपचारासाठी काही रुग्णांना नागपूर व अमरावती येथील तज्ज्ञ रुग्णालयांकडे पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली. डोळ्यांची स्वच्छता व योग्य काळजी याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

गेल्या ११ वर्षांपासून जिया मेमोरियल फाउंडेशनकडून सातत्याने अशा आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येत असून, शेकडो रुग्णांच्या मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडल्या आहेत. बसस्थानकाजवळील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक उर्दू शाळेत आयोजित या शिबिराच्या यशस्वीतेसाठी स्थानिक नागरिक, शिक्षक व स्वयंसेवकांनी सहकार्य केले. या उपक्रमाबद्दल लाभार्थी रुग्णांनी समाधान व्यक्त करत आयोजकांचे आभार मानले. ग्रामीण भागात अशा मोफत आरोग्यसेवेची गरज असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# अनधिकृत नऊ लेआउट रद्द; प्लॉटधारकांचे घराचे स्वप्न भंगले

प्रतिनिधी १८ एप्रिल

**दिग्रस** : नगरपरिषद हद्दीतील अनधिकृत ठरविण्यात आलेल्या नऊ लेआउटची मान्यता जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार रद्द करण्यात आल्याने शहरात मोठा प्रशासकीय आणि सामाजिक परिणाम दिसून येत आहे. या निर्णयामुळे संबंधित सर्व लेआउटमधील खरेदी-विक्री व्यवहार व बांधकामांवर पूर्णतः स्थगिती आली असून, हजारो प्लॉटधारकांच्या घर बांधणीच्या स्वप्नांवर अनिश्चिततेची छाया पसरली आहे.

यवतमाळ येथील सहाय्यक संचालक, नगररचना विभागाच्या चौकशी समितीच्या अहवालानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी २६ मार्च रोजी हा निर्णय घेतला होता. त्यानंतर



तत्कालीन मुख्याधिकारी अतुल पंत यांनी आदेशाची अंमलबजावणी करत संबंधित लेआउटधारकांना नोटिसा बजावल्या. तसेच उपअधीक्षक, भूमिअभिलेख कार्यालयालाही सूचना देण्यात आल्या असून या भागातील सर्व व्यवहार पूर्णपणे बंद झाले आहेत.

रद्द करण्यात आलेल्या लेआउटमध्ये एल.जी. पार्क (सचिन बनगीनवार, सतीश बनगीनवार, संदीप बनगीनवार व इतर), रविंद्र केशव पाटील यांचा लेआउट, बंग लेआउट भाग २ (अजय विजय बंग), गोल्डन पार्क (म. मोईन अ. लतीफ),

> या संपूर्ण प्रकरणामुळे एल.जी. पार्क, रविंद्र केशव पाटील लेआउट, बंग लेआउट भाग २, गोल्डन पार्क, तुळजाभवानी नगर, कृष्णभूमी (दोन्ही भाग), कृष्णभूमीला लागून असलेला लेआउट आणि पारस रेसिडेन्सी या सर्व प्रकल्पांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांकडून या प्रकरणात तातडीने तोडगा काढण्याची मागणी होत आहे.

तुळजाभवानी नगर (नारायण उकंडा अस्वार), कृष्णभूमी (संजय विजय बंग) – दोन स्वतंत्र भाग, कृष्णभूमीला लागून असलेला संजय विजय बंग यांचा लेआउट, तसेच पारस रेसिडेन्सी (मेहता लेआउट – लक्ष्मीबाई रिखबचंद मेहता) यांचा समावेश आहे. या सर्व लेआउटचे एकूण क्षेत्रफळ मोठे असून शहरातील अनेक भागांत त्यांचा विस्तार आहे.

या लेआउटमध्ये प्लॉट खरेदी करणाऱ्यांमध्ये शेतकरी, कष्टकरी, नोकरदार आणि मध्यमवर्गीय कुटुंबांचा मोठा सहभाग आहे. अनेकांनी आयुष्यभराची बचत, निवृत्ती निधी किंवा मुलांच्या भविष्यासाठी ही गुंतवणूक केली होती. मात्र, आता या लेआउटमध्ये ना बांधकाम करता येत आहे, ना खरेदी-विक्री शक्य आहे.


"कष्टाने कमावलेले पैसे गुंतवले, घर बांधण्याचे स्वप्न पाहिले, पण आता सर्व काही थांबले आहे. आमचा दोष काय?" असा संतप्त सवाल प्लॉटधारकांकडून उपस्थित केला जात आहे. या निर्णयामुळे आर्थिक नुकसानासोबतच मानसिक अस्वस्थताही वाढल्याचे चित्र आहे.

# जवाहर नवोदय विद्यालय बेलोरा दहावीचा १०० टक्के निकाल

प्रतिनिधी १८ एप्रिल

**उमरखेड** : पीएम श्री स्कूल अंतर्गत असलेल्या जवाहर नवोदय विद्यालय, बेलोरा येथील शैक्षणिक सत्र २०२५-२६ चा सीबीएसई दहावीचा निकाल शंभर टक्के लागला आहे. जाहीर झालेल्या निकालात विद्यालयातील सर्व ७६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, त्यापैकी ७५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. तसेच ६५ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले आहे.

या निकालात उमरखेड तालुक्यातील मुळावा येथील सात्विक गजानन गुंडेवार याने ९७.५० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला. मुकूटबण येथील राज मंगेश गादेवार




याने ९७.३३ टक्के गुणांसह द्वितीय, तर महागाव येथील शिवम मनोहर काळे याने ९६.५० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला.

विद्यार्थ्यांनी विषयानिहायही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. मराठी विषयात ७६ पैकी ५४ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवत विक्रम नोंदविला. तसेच कौशल्य विकास अंतर्गत 'फिजिकल ॲक्टिव्हिटी ट्रेनर' या विषयात ३७ विद्यार्थ्यांनी शंभर गुण मिळविले.

या यशाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य कमलाकर दे. घोपटे, उपप्राचार्य सुनील उराडे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## ॲड. प्रशांत देशमुख यांची रिजन चेअरमनपदी नियुक्ती

**अमरावती :** १२ एप्रिल रोजी भंडारा येथे झालेल्या लायन्स क्लब इंटरनॅशनल ३२३४ ए१ च्या प्रांतिय अधिवेशनात लायन्स क्लब ऑफ अमरावती इंद्रपुरी क्लबचे माजी झोन चेअरपर्सन अँड प्रशांत वि. देशमुख यांची लायन्स क्लब इंटरनॅशनल च्या सन २०२६-२७ रिजन चेअरपर्सनपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

आपल्या निवडिचे श्रेय विलास साखरे उप प्रांतपाल प्रथम व लायन्स



क्लब अमरावती परिवाराला दिले आहे. अँड प्रशांत यांनी या पूर्वी लायन्स क्लब इंटरनॅशनल ३२३४ एच १ ची विविध प्रकारची पदे भूषविली आहेत.

# अयान मोबाइल विसरला अन् त्याच्या मित्राने केला त्याचा ‘गेम’

प्रतिनिधी १८ एप्रिल

**अमरावती:** परतवाडा शहरातील अयान अहमद याने काही मुलींशी केलेली शारिरिक जवळीक, दोघींवर केलेला लैंगिक अत्याचार, त्या क्षणांचे केलेले व्हिडिओ रेकॉर्डिंग व ते व्हिडीओ-फोटो व्हायरल केल्याच्या प्रकरणाने आता भयानक वळण घेतले आहे.

मुख्य आरोपी अयान अहमद याच्या कृत्यासोबतच त्याचे मित्र आणि काही महाविद्यालयीन तरुणांच्या शेअर फॉरवर्डमुळे हे प्रकरण अत्यंत गंभीर बनले आहे. अयानच्या स्नॅपचॅटमधील न्यूड व्हिडिओचा ’गेम’ नेमका कसा झाला? याचा थरारक उलगडा पोलीस तपासात झाला आहे. अयान आणि उजेरखान हे जिवाभावाचे मित्र आहेत मात्र, महिनाभरापूर्वी एका पानटपरीवर अयान आपला मोबाइल विसरला आणि उजेरने याच संधीचा फायदा घेतला. अयानच्या मोबाइलचा लॉक कोड माहीत असलेल्या उजेरने त्याचे स्नॅपचॅट उघडले आणि तिथे अनेक मुलींचे आक्षेपार्ह न्यूड व्हिडिओ पाहून त्याची मती गुंग झाली. त्याने तत्काळ स्वतःच्या मोबाइलमध्ये स्नॅपचॅट डाऊनलोड करून ते सर्व व्हिडिओ चोरले. हे व्हिडिओ मो. साद आणि एहफाज खान यांना पाठवले आणि तिथून या व्हिडिओ कांडाचे बिंग फुटले, अयान हा अनेक मुलींना घेऊन अमरावती व अन्य ठिकाणी जात असतो, व्हिडिओ रेकॉर्डिंग करत असतो, हे उजेरला माहिती होते. किंबहुना हू शारकी मारण्यासाठी अयाननेही ती बाब उजेरला सांगितली होती.

## ◆ आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता

### शिक्षकाचाही सहभाग; फॉरवर्डची साखळी

या संपूर्ण साखळीत एका शिक्षकाचा हात असल्याचे समोर आले. परतवाड्यात शिकवणी वर्ग चालवणाऱ्या एहफाज खान याने आपल्या क्लासमधील मुलगी तर व्हिडिओत नाही ना, या नावाखाली ते व्हिडिओ पाहिले आणि पुढे इम्रान च नावेद यांना फॉरवर्ड केले. या साखळीत एकूण सहा जणांचा सहभाग निष्पन्न झाला आहे. दुसऱ्या साखळीत उजेरने ते व्हिडीओ मो. साद व तबरेज खान यांना पाठविले.

### भाड्याचा फ्लॅट की ‘लैंगिक अत्याचाराचा अड्डा’

दुसरीकडे, कठोरा नाका परिसरातील मानव सुगंधे या तरुणाने आपला भाड्याचा फ्लॅट अयान अहमदला भाड्याने कसा दिला? याचा धक्कादायक खुलासा झाला आहे. केवळ टू-बीएचके फ्लॅटचे भाडे परवडत नाही म्हणून ‘तासिका तत्त्वावर’ मुले-मुलींना फ्लॅट देण्याचा पार्टटाईम बिझनेस येथे सुरू होता. पोलिसांनी या प्रकरणात आतापर्यंत अनेक मोबाइल जप्त केले असून, या विकृत साखळीत आणखी किती जण अडकणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. तथा डिलिट डेटा रिकव्हर केला जात आहे.

### पीयूषने मानवला पाडले बळी, पैसेही मिळू लागले

कठोरा नाका रोडवरील त्या फ्लॅटवर मानवसोबत पीयूष नामक तरुण राहायचा. तोदेखील आपले रुम पार्टनर फ्लॅटमध्ये नसताना काही युगुलांना तेथे बोलवायचा. तासाप्रमाणे पैसे आकारायचा. मात्र अन्य जणांनी त्यावर आक्षेप घेतला. पुढे पीयूषने तो फ्लॅट सोडला. मात्र, पीयूषला फ्लॅटबाबत विचारणा व्हायची. त्यावेळी चार पैसे अधिक मिळतात, असे म्हणत त्याने मानवला त्यासाठी प्रवृत्त केले. पीयूषच्या अन्य एका मित्राच्या साहाय्याने अयान हा मानव सुगंधे याच्या संपर्कात आला. मानव हा तासाला ५०० रुपये घेऊन युगुलांना फ्लॅट ऐय्याशीसाठी द्यायचा.

### फ्लॅट आणि कॅफेंचा पंचनामा

अयान अहमदने पीडितांचे शोषण करण्यासाठी मानव सुगंधे याच्या मालकीचा कठोरा रोड येथील भाड्याचा फ्लॅट वापरला होता. पोलिसांनी या फ्लॅटची कसून झडती घेतली असून, फ्लॅट मालकालाही चौकशीचा फेरा सहन करावा लागणार आहे. एवढेच नाही तर, अयान ज्या कॅफेमध्ये पीडितांना भेटायचा, त्या अमरावती शहरातील कॅफे रॉयल १०, अचलपुरातील ’कॅफे फ्रेंड्स टाऊन’ आणि परतवाडवाच्या कॅफे सोशल जंक्शन’ सह वडर डॅम परिसरातील गार्डनचाही पंचनामा करण्यात आला.

### एस आय टी चा तपास

या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून आयपीएस अधिकारी डॉ. शुभम कुमार यांच्या नेतृत्वाखाली ४५ सदस्यांचे विशेष तपास पथक गठीत करण्यात आले आहे. पोलिसांनी अयानकडून आठ पीडितांचे १८ अश्लील व्हिडीओ, ३९ छायाचित्रे जप्त केली आहेत. यातील दोघींवर त्याने अमरावतीच्या त्या फ्लॅटवर अत्याचार केला. अयानने हे सर्व व्हिडीओ ’मस्ती’ म्हणून आणि मुलींच्या संमतीने काढल्याचा दावा केला असला, तरी कायद्याच्या कचाट्यात तो पूर्णपणे अडकला आहे. हा फ्लॅट ग्रामिण पोलिसांकडून घटनास्थळ म्हणून नोंदविला गेला आहे.
या प्रकरणात आतापर्यंत आठ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तर, १० जणांना चौकशीसाठी ताब्यात घेतले असले तरी अधिकृत अटक झालेली नाही. दरम्यान, एसआयटीतील महिला पोलिस निरीक्षक यशोधरा मुनेश्वर यांच्याशी पीडितांनी आणि त्यांच्या कुटुंबीयांना न घाबरता संपर्क साधावा व सोबतच त्यांना पुढे येण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पोलिसांनी पीडितांचे नाव आणि ओळख पूर्णतः गुप्त राखण्याची ग्वाही दिली आहे.



**अमरावतीसह परतवाड्यातील कॅफेंचा ’ऑन द स्पॉट’ पंचनामा**

मेळघाटातील बी.एस्सी. चा विद्यार्थी ते डझनावर मुलींच्या आयुष्याशी खेळणारा ’व्हिडिओ कांड’चा मुख्य सूत्रधार असलेल्या अयान अहमदच्या विकृतीचा रोज नव्याने पर्दाफाश होत आहे. १३ एप्रिल रोजी रात्रीपासून पोलिसांच्या ताब्यात असलेला अयान हा २१ एप्रिलपर्यंत पोलिसांचा ’पाहुणा’ आहे.
अमरावतीच्या कठोरा नाका परिसरातील एका टू-बीएचके फ्लॅटमध्ये अयानने काही मुलींचे आयुष्य उद्ध्वस्त केले. याप्रकरणात अटक आरोपी मानव सुगंधे याने अयानला ५०० रुपये प्रति तास या दराने हा फ्लॅट उपलब्ध करून दिला होता. १६ एप्रिल रोजी पोलिसांनी या ठिकाणी क्राइम सीन रिक्रिएट केला. धक्कादायक बाब म्हणजे, शेजाऱ्यांना या फ्लॅटमधील संशयास्पद हालचालींची माहिती होती, मात्र फ्लॅट मालकाच्या उद्दामपणामुळे कुणीही तक्रार करण्याचे धाडस केले नाही. अयानने या फ्लॅटचा वापर दोन मुलींवर सात ते आठ वेळा लैंगिक अत्याचारासाठी केल्याची कबुली दिली आहे. तो फ्लॅट मालकही पोलिसांच्या रडारवर आहे.

## १९ एप्रिलला अमरावतीत भव्य शिक्षक मेळावा; मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार आणि विद्यार्थ्यांना सायकल वाटप

प्रतिनिधी १८ एप्रिल

**अमरावती :** भाजपा शिक्षक आघाडी व शिक्षक महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने १९ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे भव्य शिक्षक मेळावा, सत्कार समारंभ आणि अनाथ व गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती शिक्षक आघाडीचे तथा भाजपाचे नेते शेखर भोयर यांनी दिली.

या कार्यक्रमात राज्य व केंद्रातील दिग्गज मान्यवरांची उपस्थिती लाभणार असून शिक्षक बांधवांचा सन्मान करण्यात येणार आहे. तसेच समाजातील अनाथ व गरजू विद्यार्थ्यांना सायकलींचे




वाटप करून त्यांच्या शिक्षणाचा प्रवास सुलभ करण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तर अध्यक्षस्थानी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी राहणार आहेत. याशिवाय विशेष अतिथी म्हणून आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापरावजी जाधव, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आदिवासी विकास मंत्री अशोकराव विके, आकाशजी फुंडकर, शालेय शिक्षण व गृह राज्यमंत्री पंकज भोयर, तसेच सरचिटणीस अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज आश्रम पद्मश्री जनार्दन पंत बोधे गुरुजी आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या मेळाव्याचे मुख्य उद्दिष्ट शिक्षकांच्या समस्या जाणून घेणे, त्या शासनापर्यंत पोहोचवणे आणि शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडवण्यासाठी एक प्रभावी व्यासपीठ निर्माण करणे हे आहे.

दरम्यान, या संदर्भात आयोजित पत्रकार परिषदेला भाजपाचे नेते शेखर भोयर, विस्मय ठाकरे, अमित बोदडे, अनिश बडगुजर, क्रांतीसिंग गहरवार, संदीप जुनघरे उपस्थित होते.

आयोजकांनी सर्व शिक्षक बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, तसेच माध्यम प्रतिनिधींनी या सामाजिक उपक्रमाची माहिती जनतेपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन केले आहे. सर्वांच्या सहकार्यामुळे हा कार्यक्रम यशस्वी होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

## आ. रवी राणा यांच्या पाठपुराव्याने भातकुली कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापनेचा निर्णय

प्रतिनिधी १८ एप्रिल

**अमरावती:** रवी राणा यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर भातकुली येथे कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन करण्याबाबत आदरणीय मुख्यमंत्री व पणन व सहकार मंत्री यांचे आदेशाने राज्य शासनाकडून आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. संबंधित प्रस्तावास मान्यता देत शासन निर्णयही जाहीर झाला असून, यासाठी मुख्यमंत्री तसेच सहकार व पणन विभागाने सकारात्मक भूमिका घेतल्याचे सांगण्यात आले.

या निर्णयानुसार प्रशासनाकडून आवश्यक कार्यवाही सुरू करण्यात आली होती. मात्र, अमरावती कृषी उत्पन्न



बाजार समितीच्या विद्यमान संचालक, व्यवस्थापन समितीने या प्रक्रियेविरोधात न्यायालयात धाव घेतल्यामुळे या उपक्रमाला तात्पुरता अडथळा निर्माण झाला आहे. मात्र संचालक मंडळाने केलेला भ्रष्टाचार लपविण्यासाठी त्यांनी हा खोडा घातल्याची तालुक्यात चर्चा सुरू झाली आहे.

दरम्यान, भातकुली येथे स्वतंत्र बाजार समिती स्थापन करण्याच्या मागणीसाठी ‘भातकुली कृषी उत्पन्न बाजार समिती बचाव समिती’ची स्थापना करण्यात आली आहे. आमदार राणा यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेली ही समिती प्रशासनिक तसेच न्यायालयीन स्तरावर पाठपुरावा करणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

या बैठकीत संबंधित प्रकरणात न्यायालयीन लढा देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, शेतकऱ्यांच्या हितासाठी बाजार समितीची स्थापना आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. तसेच, या प्रक्रियेत अडथळा आणणाऱ्या घटकांविरोधात कायदेशीर मार्गाने भूमिका मांडण्यात येणार असल्याचेही नमूद करण्यात आले.

भातकुली येथे कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन झाल्यास स्थानिक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य बाजारभाव मिळण्यास मदत होणार असून, अमरावती येथे जाण्याची गरज कमी होऊन वेळ व खर्चाची बचत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी मंगेश पाटील इंगोले, आशिष कावरे, इत्यादी उपस्थित होते.

## उष्णतेची तीव्रता वाढली; नागरिकांनी आवश्यक ती काळजी घ्यावी

### ◆ आयुक्त वर्षा लड्डा व डॉ. विशाल काळे यांचे आवाहन

प्रतिनिधी १८ एप्रिल

**अमरावती :** शहरात मागील काही दिवसांपासून तापमानात सातत्याने वाढ होत असून उष्णतेची तीव्रता जाणवत आहे. वाढत्या तापमानामुळे उष्माघाताचा धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता नागरिकांनी स्वतःच्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त वर्षा लड्डा व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांनी केले आहे.

सध्या उन्हाळ्याचा कडाका वाढत असून दुपारच्या वेळेत सूर्याची तीव्रता अधिक असते. त्यामुळे दुपारी १२ ते ३ या वेळेत शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे, असे प्रशासनाने सांगितले आहे. अत्यावश्यक कामाशिवाय बाहेर जाणे टाळावे. जर बाहेर जाणे आवश्यक असेल तर डोके झाकण्यासाठी टोपी, कॅप, गॉगल किंवा ओढणीचा वापर करावा. तसेच हलक्या रंगाचे आणि सैल सूती कपडे परिधान केल्यास शरीरावर उष्णतेचा परिणाम कमी होण्यास मदत होते.

नागरिकांनी दिवसाभरात पुरेशा प्रमाणात पाणी पिणे अत्यंत गरजेचे आहे. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्यास थकवा, चक्कर येणे, मळमळ, डोकेदुखी यांसारखी लक्षणे दिसू शकतात. त्यामुळे नियमित अंतराने पाणी पिणे, तसेच ओआरएस, लस्सी, ताक, लिंबूपाणी, नारळपाणी यांसारखे द्रव पदार्थ सेवन करणे आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. मद्यपान, जास्त प्रमाणात चहा-कॉफी तसेच कार्बोनेटेड पेये यांचे सेवन टाळावे, कारण यामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होण्याची शक्यता असते.

उन्हात काम करणाऱ्या मजुरांनी, बांधकाम कामगारांनी तसेच रस्त्यावर काम करणाऱ्या व्यक्तींनी वेळोवेळी सावलीत विश्रांती घ्यावी. दीर्घकाळ थेट उन्हात काम करणे टाळावे. कामाच्या दरम्यान डोके व चेहरा ओल्या कापडाने झाकल्यास उष्णतेपासून काही प्रमाणात संरक्षण मिळू शकते. शक्य असल्यास सकाळी किंवा सायंकाळी काम करण्यास प्राधान्य द्यावे, असेही आवाहन करण्यात आले आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, गर्भवती महिला तसेच आधीपासून आजार असलेल्या व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी. अशा व्यक्तींना उष्णतेचा त्रास होण्याची शक्यता अधिक असल्याने त्यांना थेट उन्हात जाणे टाळावे. घरात थंड आणि हवेशीर वातावरण ठेवावे तसेच शरीरातील पाण्याचे प्रमाण कायम ठेवण्यावर भर द्यावा.

उष्माघाताची काही लक्षणे दिसल्यास त्वरित सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. एखाद्या व्यक्तीस चक्कर येणे, डोकेदुखी, मळमळ, उलटी, जास्त घाम येणे, अशक्तपणा किंवा बेशुद्धी जाणवत असल्यास त्याला त्वरित सावलीत किंवा थंड ठिकाणी हलवावे. त्या व्यक्तीचे कपडे सैल करावेत आणि शरीरावर थंड पाणी टाकून शरीराचे तापमान कमी करण्याचा प्रयत्न करावा. तसेच त्याला पाणी, ओआरएस किंवा इतर द्रव पदार्थ द्यावेत.

परिस्थिती गंभीर वाटल्यास संबंधित व्यक्तीस तातडीने जवळच्या शासकीय किंवा खासगी आरोग्य केंद्रात दाखल करावे, जेणेकरून वेळेत वैद्यकीय उपचार मिळू शकतील. उष्णतेमुळे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सतर्क राहणे आवश्यक आहे.

शहरातील नागरिकांनी उष्णतेच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेने दिलेल्या सूचनांचे पालन करून स्वतःची व कुटुंबीयांची काळजी घ्यावी, असे आवाहन अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त वर्षा लड्डा व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांनी केले आहे.

## अक्षय्य तृतीयेला बालविवाह केल्यास थेट तुरुंगवास

प्रतिनिधी १८ एप्रिल

**अमरावती जिल्हा प्रशासनाचा इशारा**

**अमरावती:** येत्या अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर जिल्ह्यात बालविवाह होण्याची शक्यता लक्षात घेता, जिल्हा प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. बालविवाह लावल्यास थेट कारावासाची कारवाई करण्यात येणार आहे, असा स्पष्ट इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे. तसेच बालविवाहासाठी संपूर्ण जिल्ह्यात विशेष जनजागृती मोहीम राबवण्यात येत आहे.

जिल्हा महिला व बाल विकास कार्यालयातर्फे शहर आणि ग्रामीण भागात मोहिम राबवली जात आहे. बालविवाह ही केवळ सामाजिक कुप्रथा नसून तो एक गंभीर आणि दखलपात्र गुन्हा आहे, याची जाणीव समाजात निर्माण करण्यासाठी ही मोहिम राबविण्यात येणार आहे. बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ नुसार १८ वर्षांखालील मुलगी आणि २१ वर्षांखालील मुलगा यांचा विवाह लावणे हा दंडनीय गुन्हा आहे. अशा विवाहात सहभागी होणारे पालक, आयोजक, भटजी (गुरुजी) आणि इतर सर्व व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

## ग्रामीण काँग्रेस अध्यक्षासाठी प्रकाश साबळे यांचा अर्ज

प्रतिनिधी १८ एप्रिल

**अमरावती :** काँग्रेस पक्षाचे आक्रमक नेतृत्व, शेतकऱ्यां चे लढवय्ये नेतृत्व प्रकाश साबळे यांनी दिनांक १७ एप्रिल २०२६ रोजी AICC निरीक्षक अहमद त्यांच्याकडे अमरावती जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटी अध्यक्ष पदासाठी अर्ज दाखल केला.

त्यांच्या समवेत पक्ष संघटने संदर्भात सविस्तर चर्चा करून काँग्रेसला प्रायव्हेट लिमिटेड कंपनी समजणाऱ्या पासून पक्षाला वाचवावे ,अशी आग्रहीमागणी केली. तसेच आम्ही पक्ष विरोधातले नसून हेकेखोर व्यक्ती विरोधात आमची भूमिका आहे, आणि ती भविष्यात पण राहील असे नमूद केले. विधान परिषदा निवडणुका ,जिल्हा परिषद निवडणुका, लोकसभा व विधानसभा मध्ये झालेल्या निवडणुका याबाबत प्रकाश साबळे यांनी त्यांची स्पष्ट भूमिका मांडली.



## अण्णासाहेब पाटील महामंडळाचा १६७० कोटींचा व्याज परतावा वितरीत

### ◆ १.७७ लाख तरुणांना स्वयंरोजगाराची संधी

प्रतिनिधी १८ एप्रिल

**अमरावती:** राज्यातील मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास घटकांसाठी कार्यरत असलेल्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाने प्रगतीचा नवा टप्पा गाठला आहे. महामंडळाच्या व्याज परतावा योजनेच्या माध्यमातून आतापर्यंत राज्यातील १ लाख ७७ हजारांहून अधिक तरुण उद्योजकांना स्वयंरोजगाराची संधी मिळाली असून, तब्बल १ हजार ६७० कोटी रुपयांचा व्याज परतावा थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आला आहे.

महामंडळाच्या आकडेवारीनुसार, आर्थिक वर्ष २०२५-२६ या एकाच वर्षात सर्वाधिक ५८८.६९ कोटी रुपयांचा व्याज परतावा वितरित करण्यात आला आहे. पारदर्शक प्रक्रिया आणि ’थेट लाभ हस्तांतरण’मुळे लाभार्थ्यांचा महामंडळावरील विश्वास वाढल्याचे चित्र दिसत आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून लाभार्थ्यांचा प्रवास सुलभ करण्यासाठी महामंडळाने दोन महत्त्वाच्या सुविधा सुरू केल्या आहेत. यात महामंडळाच्या संकेतस्थळावर चोवीस तास उपलब्ध असलेल्या चॅटबॉटद्वारे १५ हजार ५०० पेक्षा जास्त लाभार्थ्यांनी कागदपत्रे आणि पात्रता याबाबत शंकांचे निरसन केले आहे.

तसेच ८९७६८५५९२१या व्हॉट्स?प सेवेमध्ये आता लाभार्थ्यांना त्यांच्या अर्जाची स्थिती, पात्रता प्रमाणपत्र अपडेट्स आणि व्याज परताव्याची माहिती थेट मोबाईलवर मिळणार आहे. तसेच, नवीन शासन निर्णयांसाठी स्वतंत्र व्हॉट्स?प चॅनेलही कार्यान्वित करण्यात आले आहे.

महामंडळाच्या वाढत्या व्यापाचा विचार करून नवी मुंबईतील पनवेल येथे अत्याधुनिक मुख्यालय उभारण्यात येणार आहे. सिडकोने या प्रकल्पासाठी सुमारे दिड एकर जागा केवळ एक रुपया प्रति चौ.मी. या नाममात्र दराने मंजूर केली आहे. या प्रस्तावित इमारतीत प्रशासकीय कार्यालयासोबतच निवासी प्रशिक्षण केंद्र, कौशल्य विकास विभाग, डिजिटल सेवा केंद्र आणि संशोधन सुविधा उपलब्ध असतील.

## मोकाट जनावरांचा रस्त्यावर ठिय्या ; अपघाताला आमंत्रण



वाशीम : शहरात मोठ्या प्रमाणात- मोकाट गुरांचा सुसाट असून भर रस्त्यामध्ये आपले बस्तान मांडत असून नगरपालिकेचे याकडे दुर्लक्ष असून मुख्याधिकारी मोकाट गुरांमुळे अपघाताला आमंत्रण असून मोकाट गुरांना दोरखंड बांधाल का असा सवाल शहरवासीय कडून होत आहे . शहरात मोकाट जनावरे सामुहिक रित्या रस्त्याच्या मधोमध बसल्यामुळे अनेक अपघात घडले आहे. जनावरांचा बंदोबस्त करण्यासाठी नगर पालिकेने पुढाकार घेवून जनावरांच्या मालकांवर कारवाई करावी अशी मागणी होत आहे. या जनावरांसाठी कोंडवाड्याची सुविधा करावी. मंगरुळपीर शहरात ठिकठिकाणी मोकाट गुरांचा ठिय्या असून मोकाट गुरे भर रस्त्यावर बसने,रस्त्यावर वावरणे इत्यादी कारणां मुळे वाहतुकीस अडथळा येत असून किरकोळ अपघात घडत आहेत तसेच शहरात घाण होत आहे.

## सागर कोकास यांच्या प्रयत्नाला यश छान...

# 'त्या' १०९ वृक्षांना जीवदान !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

**येथील अकोला नाका परिसर ते हिंगोली मार्गावर रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या १०९ सार्वजनिक वृक्षांची तोड करू नये यासाठी येथील सामाजिक कार्यकर्ते,वृक्षप्रेमी सागर कोकास यांनी वाशीम येथील विद्यमान दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांच्या न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे. १६ एप्रिल २०२६ रोजी या सार्वजनिक १०९ वृक्षांपैकी काही वृक्षांची तोड सुरू असल्याची बाब अर्जदार सागर कोकास यांचे निदर्शनास येताच त्यांनी तत्काळ 'त्या' १०९ वृक्षांना जीवदान मिळण्यासाठी मा. न्यायालयामध्ये अर्ज व प्रतिज्ञा पत्र दाखल केले. या अर्जावर मा. न्यायालयाने अर्जदारांच्या वकीलाचा युक्तीवाद ऐकून येथील प्र. सह दिवाणी न्यायाधीश एस.एस. सहस्त्रबुद्धे यांनी या प्रकरणातील प्रतिवादींनी तात्पुरत्या मनाई हुकुमाच्या अर्जावर सुनावणी होवून पुढील आदेश होईपर्यंत 'जैसे थे' परिस्थिती ठेवावी तसेच कोणतेही झाड तोडू नये असा आदेश १६ एप्रिल रोजी पारीत केला आहे.**

### न्यायालयाचा 'जैसे थे'चा आदेश





येथील विद्यमान दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांचे न्यायालयात सामाजिक कार्यकर्ते,वृक्षप्रेमी सागर कोकास यांनी वाशीम पालिकेच्या हद्दीतील अकोला नाका परिसर ते हिंगोली रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या सार्वजनिक १०९ झाडांची तोडणी करू नये याबाबत प्रकरण दाखल केले आहे.सद्या हे प्रकरण न्यायप्रवीष्ठ असताना प्रतिवादीकडून १६ एप्रिल २०२६ रोजी वाशीम शहरातील अकोला नाका,पोस्ट ऑफीस व ईतर परिसरातील मोठ्या वृक्षांची तोडणी सुरु असल्याचे अर्जदार सागर कोकास यांचे निदर्शनास आले.सागर कोकास यांनी तत्काळ मा.न्यायालयामध्ये याबाबतीत अर्ज व प्रतिज्ञा पत्र सादर करून मा.न्यायालयाच्या प्रतिवादीचे कृत्य निदर्शनास आणून दिले.तसेच या दाव्यात मूळ दावा निकाली लागेपर्यंत वाद मिळकतीवरील असलेल्या १०९ वृक्षांची 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याबाबतचा आदेश पारीत करण्यात यावा अशी मा.न्यायालयाला विनंती केली. तसेच प्रतिवादी यांचे विरूद्ध वाद मिळकतीवरील वृक्षांची 'जैसे थे' परिस्थिती न ठेवल्यास प्रतिवादी वृक्षांची कटाई करण्याच्या वाईट हेतूमध्ये सफल होतील.आणि अवैध वृक्ष तोड करून त्याचे लाकूड काळ्या बाजारात ज्यादा दराने विकण्याच्या वाईट हेतूमध्ये सफल होतील.ही बाब अर्जदाराने मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणून देवून त्या सर्व वृक्षांची 'जैसे थे'परिस्थिती ठेवण्याबाबतचा आदेश पारीत केल्यास प्रतिवादी पक्षाचे कोणतेही नुकसान होणार नाही.करीता या प्रकरणात न्यायोचित आदेश पारीत करण्यात यावा अशी विनंती ही कोकास यांनी त्यांचे अर्जात केली. या प्रकरणात मा.न्यायालयाने वादीच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.वादीने अर्जात प्रतिवादी १०९ वृक्ष तोडण्याच्या तयारीत असल्याचे कथन केले आहे.काही वृक्षांची तोड केल्याचे देखील वादीने अर्जात नमूद केले आहे.वादीने अर्जासोबतच प्रतिज्ञा लेख दाखल केला आहे.या प्रकरणात सर्व प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे सादर केलेले नाही.त्यामुळे अंतरीम मनाई हुकुमाच्या अर्जाचा निकाल लागण्यास कालावधी लागणार आहे.त्यामुळे वादीच्या म्हणण्याप्रमाणे 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याचा आदेश पारीत करणे योग्य ठरेल असा निष्कर्षही मा.न्यायालयाने या प्रकरणात काढला आहे.त्यामुळे या प्रकरणातील प्रतिवादींनी तात्पुरत्या मनाई हुकुमाच्या अर्जावर सुनावणी होवून पुढील आदेश होईपर्यंत 'जैसे थे' परिस्थिती ठेवावी,तसेच कोणतेही झाड तोडू नये असा आदेश येथील प्र.सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) एस.एस.सहस्त्रबुद्धे यांनी १६ एप्रिल रोजी पारीत केला आहे.




## थोडक्यात

### जिल्ह्यात वाढत्या तापमानाचा इशारा

**उष्माघात टाळण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना जारी**

**वाशिममध्ये ४० अंश सेल्सीयस तापमान**




● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यात मागील २ ते ३ दिवसांपासून तापमानात लक्षणीय वाढ होत असल्याची माहिती भारतीय मौसम विज्ञान केंद्र, नागपूर यांनी दिली आहे. वाढत्या उष्णतेमुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने उष्माघात टाळण्यासाठी आवश्यक 'काय करावे व काय करू नये' याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. उष्माघाताचा धोका टाळण्यासाठी नागरिकांनी खालील उपायांचे काटेकोर पालन करावे:

दुपारी १२ ते ३ या वेळेत शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे. पुरेसे पाणी पिणे अत्यंत आवश्यक असून तहान नसली तरीही दर अर्ध्या तासाने पाणी प्यावे. बाहेर जाताना डोके झाकण्यासाठी छत्री, टोपी किंवा पांढरा शेला/दुपट्टा वापरावा.घरात सूर्यप्रकाश येऊ नये यासाठी पडदे व झडपा लावाव्यात. हलक्या, पातळ व सच्छिद्र सूती कपड्यांचा, विशेषतः पांढऱ्या रंगाच्या कपड्यांचा वापर करावा. प्रवास करताना व कामाच्या ठिकाणी पुरेसे थंड पिण्याचे पाणी सोबत ठेवावे.

शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊ नये म्हणून ओआरएस, लिंबूपाणी, ताक, लस्सी यांसारख्या घरगुती पेयांचे सेवन करावे. घर थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर, सनशेडचा वापर करावा व रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्यात.गरजेनुसार कुलर, पंखे किंवा वातानुकूलन (एसी) यांचा वापर करावा. कामगारांना थेट सूर्यप्रकाश टाळण्यासाठी योग्य सूचना द्याव्यात. गरोदर महिला, आजारी व्यक्ती, वयोवृद्ध आणि लहान मुले यांची विशेष काळजी घ्यावी.उन्हात काम करताना चेहरा व डोके ओल्या कापडाने झाकावे. शक्यतो दुपारच्या वेळेत श्रमाची कामे टाळावीत. चक्कर आल्यास किंवा अस्वस्थ वाटल्यास तात्काळ वैद्यकीय सल्ला घ्यावा. जनावरांनाही सावलीत ठेवून त्यांना पुरेसे पाणी द्यावे.

**'हे करू नये'**

दुपारी १२ ते ३ या वेळेत उन्हात जाणे टाळावे. गडद, जाड किंवा घट्ट कपडे घालू नयेत. तापमान जास्त असताना शारीरिक श्रमाची कामे करू नयेत. उच्च प्रथिनयुक्त व शिळे अन्न खाणे टाळावे.

**उष्माघात झाल्यास काय करावे?**

उष्णतेच्या लाटेमुळे आजारी पडलेल्या व्यक्तीची तातडीने काळजी घेणे आवश्यक आहे. मद्य, चहा, कॉफी व कार्बोनेटेड शीतपेये देऊ नयेत. बाधित व्यक्तीचे शरीर थंड करण्यासाठी ओल्या कापडाने पुसावे. रुग्णाला ओआरएस, ताक, लस्सी किंवा लिंबूपाणी द्यावे. तसेच बाधित व्यक्तीला तात्काळ जवळच्या आरोग्य केंद्रात दाखल करून उपचार सुरू करणे अत्यंत आवश्यक आहे. उष्माघात गंभीर व जीवघेणा ठरू शकतो.उष्णतेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क राहून वरील सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर वाशिम यांनी केले आहे.

# शिबिरात नाही केले समाधान, नायब तहसीलदाराचा वसुलीलाच मान !

## आयोजित समाधान शिबिराला सोडले, महामार्गावर बसून वाहनाना अडविले




● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

तहसील कार्यालय रिसोड यांच्या वतीने 'छत्रपती शिवाजी महाराज महास्वराज्य समाधान शिबीर - टप्पा क्र. १' चे आयोजन जि. प. शाळा, केनवड येथे करण्यात आले होते. सकाळी ११ वाजता सुरू झालेल्या या शिबिराचा उद्देश महसूल विभागाच्या विविध सेवा एकाच ठिकाणी नागरिकांना उपलब्ध करून देणे हा होता.

या शिबिरात फेरफार प्रकरणे, सातबारा व ८-अ उतारे, विविध प्रमाणपत्रे, सामाजिक योजनांचे लाभ, तुकडेबंदी प्रकरणे, पाणंद रस्ते मान्यता, घरपट्टे वाटप, ई-मोजणी, पीएम किसान नोंदणी आदी कामे अपेक्षित होती.

मात्र प्रत्यक्षात १६ टेबलांपैकी अनेक टेबल रिकामे असल्याचे दिसून आले. काही ठिकाणीच कर्मचारी उपस्थित होते, तर पंचायत समितीचा एकही अधिकृत अधिकारी हजर नसल्याची माहिती नागरिकांनी दिली.दरम्यान, तहसीलदार कुळमेथे यांनी शिबिराला केवळ औपचारिक भेट देत फुलगुच्छ स्वीकारला आणि अवघ्या अर्ध्या तासात तेथून निघून गेल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे अनेक नागरिकांच्या तक्रारींचे अपेक्षित निराकरण झाले नाही. या शिबिरात सुमारे ६० नागरिकांचे अर्ज प्राप्त झाले. काहींना तत्काळ प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले, तर काहींचे अर्ज स्वीकारून त्यांचे लवकरच निराकरण करण्यात येईल असे सांगण्यात आले. तरीही, नायब तहसीलदार घटनास्थळी अनुपस्थित असल्याने अनेक प्रकरणे तात्काळ निकाली निघू शकली नाहीत.

विशेष म्हणजे, शिबिरस्थळावरून 'काम आहे' असे सांगून निघाल्यानंतर संबंधित अधिकारी मेहकर–मालेगाव महामार्गावर जाऊन वाळू वाहतूक करणाऱ्या डंपरांवर कारवाई करत असल्याचे दिसून आले. या कारवाईसाठी त्यांनी सुमारे १ ते १.५ तास महामार्गावर ठाण मांडल्याची माहिती मिळाली आहे. यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून, 'समाधान शिबिरासाठी वेळ नाही, पण वाळू कारवाईसाठी वेळ कसा मिळतो?' असा सवाल उपस्थित केला जात आहे.कार्यक्रम व्यवस्थित सुरू असतानाच जबाबदार अधिकारी शिबिर सोडून गेल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत होती. 'अधिकारीच अशा प्रकारे पळ काढत असतील, तर नागरिकांच्या समस्या कोण सोडवणार?' असा प्रश्न उपस्थित केला जात होता.

### शिबिराला नाही वेळ, महामार्गावर थांबून वसुलीचा खेळ

केनवडमध्ये सुरू असलेल्या समाधान शिबिरात नागरिकांच्या समस्या ऐकण्यासाठी वेळ नव्हता, मात्र त्याच वेळी महामार्गावर वाळूचे डंपर पकडण्यासाठी आपण उपस्थित होता. शासनाने नागरिकांच्या तक्रारी सोडवण्यासाठी हे शिबिर आयोजित केले, मग नागरिकांनाच का वाऱ्यावर सोडले?जर वेळ नव्हताच, तर शिबिरात येऊन केवळ औपचारिकता का पार पाडली? थोड्या वेळासाठी येऊन निघून जाण्यापेक्षा शिबिरात थांबून नागरिकांचे प्रश्न सोडवणे अपेक्षित होते.आज परिस्थिती अशी आहे की, नागरिकांचे समाधान करण्यापेक्षा वाळूच्या गाड्यांवर कारवाई करण्यालाच प्राधान्य दिले जात असल्याचे चित्र दिसत आहे. त्यातून नेमके काय साध्य होते आणि कोणाला काय 'मलिदा' मिळतो, असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.'

### यांनीच दिला होता शेतकऱ्याला आत्महत्येचा सल्ला

मागील काही महिन्यांपूर्वी केनवड येथील रस्त्याच्या प्रकरणात याच नायब तहसीलदार कुळमेथे यांनी एका शेतकऱ्याला आत्महत्येचा सल्ला दिल्याचा आरोप स्थानिक स्तरावर चर्चेत आला होता. या घटनेमुळे त्यावेळीही संताप व्यक्त करण्यात आला होता.दरम्यान, शासनाच्या वतीने नागरिकांच्या समस्या तात्काळ सोडवण्यासाठी समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. मात्र अशा महत्त्वाच्या शिबिरात संबंधित अधिकारी थांबले नाहीत, तर दुसरीकडे महामार्गावर वाळू वाहतुकीवरील कारवाईसाठी तासनतास वेळ देत असल्याचे दिसून आले.यामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत असून, 'शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांपेक्षा इतर बाबींना प्राधान्य दिले जात आहे का?' असा सवाल उपस्थित केला जात आहे.तसेच, काही नागरिकांनी असा आरोप केला की, समाधान शिबिरात नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी वेळ नसताना महामार्गावर वाळू गाड्यांवर कारवाईसाठी मात्र वेळ दिला जात आहे.या कारवायांमागे नेमके काय उद्दिष्ट आहे आणि त्यातून कोणाला काही 'मलिदा' मिळतो का, याबाबतही विविध शंका व्यक्त केल्या जात आहेत.










# समाधान शिबिरामध्ये ५५६ लाभार्थ्यांचे समाधान !

## शासन आपल्या दारी उपक्रम, झाले तक्रारीचे निवारण

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●




छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर टप्पा क्रमांक १ अंतर्गत आज दिनांक १७ /४/२०२६ रोजी सकाळी ९ वाजता राजस्व मंडळ धनज बु.येथे कृषी उत्पन्न बाजार समिती शेतकरी भवनमध्ये मा.योगेश कुंभेजकर जिल्हाधिकारी, मा.उपविभागीय अधिकारी कैलास देवरे कारंजा,तहसीलदार रवी महाले तहसील कार्यालय कारंजा यांच्या मार्गदर्शनात शिबिराचे आयोजन करण्यात आले.शिबिराचे अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकारी योगेशजी कुंभेजकर व प्रमुख उपस्थिती कैलास देवरे उपविभागीय अधिकारी कारंजा व सरपंच मिलिंद मुंदे,पंचायत समिती सदस्य मयूरभाऊ मस्के,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विजय हिवाळे यांच्या उपस्थित सदर समाधान शिबिरामध्ये दाखले वाटप करण्यात आले तसेच वंदना कार्ड,आयुष्यमान कार्ड १८५ वाटप करण्यात आले.तालुका निरीक्षक भूमि अभिलेख कार्यालयातर्फे १५० सनद चे वाटप करण्यात आले.एकात्मिक बालविकास योजना कारंजा तर्फे ३ बेबी कीट,उमेद बचत गटातर्फे त्यांच्या प्रॉडक्ट चे प्रदर्शन,एम.आर.इ.जी.एस.जॉब कार्ड १० वाटप,पुरवठा विभागातर्फे ११लाभार्थींना रेशन कार्ड चे वाटप,संजय गांधी विभागातर्फे १० लाभार्थींना प्रमाणपत्र वाटप,श्रावण बाळ योजनेचे १० लाभार्थी प्रमाणपत्र वाटप, गोल्डन कार्ड ६ प्रमाणपत्र वाटप,कृषी विभागातर्फे ११ लाभार्थींना सिंचन,फळबाग तसेच २ ट्रॅक्टर व ७ प्रमाणपत्र वाटप,महसूल विभागातर्फे १६० लाभार्थींना सातबारा फेरफार व ८ अ चे वाटप,असे एकूण ५५६ लाभार्थींना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता मंडळ अधिकारी जय हिंद कांबळे,ग्राम महसूल अधिकारी सतीश दाभाडे,निलेश कांबळे, प्रवीण उमक,विनोद नागलकर,व तालुक्यातील सर्व ग्राम महसूल अधिकारी व महसूल सेवक यांनी परिश्रम घेतले संपूर्ण कार्यक्रमाला ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती सदर कार्यक्रमात उपस्थित ग्रामस्थांकरिता अल्प उपहार ठेवण्यात आले होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक विनोद हरणे नायब तहसिलदार यांनी केले,उपविभागीय अधिकारी कैलास देवरे यांनी शिबिरा बाबत सर्व योजनेची माहिती दिली,मंडळ कृषी अधिकारी श्रीकृष्ण बेलखेडे यांनी कृषी विभागांची संपूर्ण माहिती दिली,तालुका भूमी अधीक्षक जाधव साहेब यांनी ऑनलाइन मोजणी संदर्भात क्यू आर कोड ची माहिती दिली,दुय्यम निबंधक देशपांडे साहेब यांनी खरेदी विक्री व्यवहार तसेच सलोखा योजनेबाबत संपूर्ण माहिती दिली,आरोग्य विभागातर्फे प्रवीण शेट्टीवार यांनी माहिती दिली,पुरवठा विभागाचे स्मिता नायगावकर यांनी राशन कार्ड बाबत सर्व माहिती दिली,जनगणना २०२७ बाबत नायब तहसीलदार अनिल वाडेकर यांनी माहिती दिली,आधार केंद्र तसेच अंगणवाडी सेविका,एसटी महामंडळ कारंजा यांचे सर्व प्रतिनिधी हजर होते त्यांनी आपल्या विभागांच्या सर्व माहिती पुरवल्या.सेतू सुविधा केंद्र यांनी ऑनलाइन बाबत सर्व माहिती दिली शेवटी आभार प्रदर्शन अनिल वाडेकर नायब तहसीलदार यांनी केले.कार्यक्रमाला बहुसंख्येने मंडळातील शेतकरी व गावकरी उपस्थित होते.

## महात्मा फुले हे जागतिक विचारांची पायाभरणी करणारे पहिले समाजसुधारक

### प्रा. अशोक राणा यांचे प्रतिपादन

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



समाजाला जागतिक स्पर्धेत टिकायचे असेल तर जागतिक विचार सुद्धा आत्मसात करावे लागतील. ही बाब हेरून क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले यांनी जागतिक विचार आत्मसात करत ते भारतात रुजविण्याचे कार्य केले. त्यांनी सत्यशोधनाचा नवा विचार पेरून पिढ्यान, पिढ्यांच्या गुलामगिरीतुन बहुजन समाजाची सुटका केली, असे गौरवोद्गार प्रा. अशोक राणा यांनी काढले.

क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंती व द्विशताब्दी जन्मोत्सवी वर्षानिमित्त क्रांतीसुर्य सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने फुले स्मारक परिसरात दि. ११ एप्रिल रोजी आयोजित जाहीर व्याख्यानात प्रा. राणा यांनी सविस्तर मांडणी केली. 'क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले यांचे समाजकार्य आणि आजची सामाजिक स्थिती' या विषयावर बोलताना त्यांनी आजही फुलेंचे विचार कसे लागू पडतात याचे दाखले दिले. यावेळी विचारपीठावर ज्येष्ठ सत्यशोधक विचारवंत डॉ. रवी जाधव, रामप्रभू सोनोने, डॉ. विजय कानडे, माजी नगराध्यक्ष लक्ष्मणराव इंगोले, प्रल्हाद रंधवे, लिलाबाई रंधवे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरणताई गिऱ्हे यांनी केले. अरविंद उलेमाले यांनी प्रा. राणा यांचा परिचय करून दिला तर सदानंद इंगोले यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या कार्यक्रमाला शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते . कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उत्सव समितीच्या कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
शनिवार, दि. १८ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## मलकापूर पालिके समोर कंत्राटी सफाई कामगारांचा ठिय्या

**मलकापूर :** थकीत वेतनाच्या मागणीवरून मलकापूर नगरपालिकेतील ७२ कंत्राटी सफाई कामगारांनी शुक्रवारी, दि. १७ एप्रिल रोजी पालिका आवारात ठिय्या आंदोलन करत आक्रमक भूमिका घेतली. दिवसभर सुरू असलेल्या या आंदोलनामुळे पालिकेची स्वच्छता व्यवस्था पूर्णपणे ठप्प झाली असून, शहरात खळबळ उडाली आहे.

नगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत गेल्या अनेक वर्षापासून कंत्राटी पद्धतीने सफाई सेवा पुरविण्यात येत आहे. संबंधित कंत्राटदारांच्या माध्यमातून कार्यरत असलेल्या सफाई कामगारांना १ जानेवारी ते१५ मार्च २०२६ या कालावधीत सुमारे अडीच महिन्यांचे वेतन देण्यात आलेले नाही. यामुळे संतप्त झालेल्या कामगारांनी ठिय्या आंदोलनाचा मार्ग अवलंबला. आंदोलनादरम्यान कामगारांनी घोषणाबाजी केली.दरम्यान, नगराध्यक्ष अतीक जवारीवाले, मुख्याधिकारी संजय केदार तसेच नगरसेवकांची बैठक घेण्यात आली.

# हॉटेलमध्ये गॅस सिलिंडरचा स्फोट

## दोन जण जखमी ; भीतीने बाजूच्या बिल्डिंगमधील युवती खाली कोसळली

प्रतिनिधी १८ एप्रिल

**खामगाव :** शहरातील जलंब रोडवरील वाडी परिसरात शुक्रवार, सायंकाळी सुमारे ५:३० वाजता एका हॉटेलमध्ये गॅस सिलिंडरचा भीषण स्फोट झाला. या घटनेत एक वृद्ध शिवणकाम कारागीर व शेजारच्या इमारतीतील एक युवती जखमी झाली असून, परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हॉटेलमध्ये एकापाठोपाठ तीन गॅस सिलिंडरचा स्फोट झाला. या स्फोटात अरुण अनोकार (७२), हे शिवणकाम करणारे कारागीर गंभीररीत्या भाजले.



घटने वेळी ते दुकानातील ग्राहकांचे कपडे आणण्यासाठी आत गेले होते. त्याचवेळी शेजारील इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर असलेली कादंबरी किरण आचार्य (१९) ही स्फोटाच्या धक्क्यामुळे खाली कोसळली. तिच्या चेहऱ्यावर गंभीर दुखापत झाली असून, फॅक्चर झाल्याचे सांगण्यात येत आहे.जखमी दोघांनाही तत्काळ वेगवेगळ्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. संबंधित हॉटेल अरुण कोलते यांच्या मालकीचे असल्याचे समजते. स्फोटामुळे हॉटेलमधील साहित्याचे मोठे नुकसान झाले असून, हिमांशू नाहर या युवकाची दुचाकी देखील आगीत जळून खाक झाली. घटनेची माहिती मिळताच खामगाव शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक रामकृष्ण पवार, पीएसआय राजेश गोमासे, संतोष गायकवाड व राम धामोळे घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन विभागाच्या दोन बंबांच्या मदतीने आग आटोक्यात आणण्यात आली. तसेच, भाजप मीडिया सेलचे सागर फुंडकर, तहसीलदार सुनील पाटील व महावितरण तसेच महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनीही घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

# कृषी विभाग ॲक्शन मोडमध्ये ; नियमभंगावर शून्य सहनशीलता !

### - खरीपपूर्व हंगाम : २३०० केंद्रांवर टप्प्याटप्प्याने धडक
### - ६९ केंद्रांच्या तपासणीत ८ केंद्रांचे परवाने निलंबित

प्रतिनिधी १८ एप्रिल

**बुलढाणा :** खरीप हंगामाच्या तोंडावर जिल्ह्यातील २३०० कृषी सेवा केंद्रांची टप्प्याटप्प्याने तपासणी सुरू असून, आतापर्यंत ६९ केंद्रांची पडताळणी करण्यात आली आहे. या तपासणीत गंभीर त्रुटी आढळल्याने ८ केंद्रांचे खत विक्री परवाने निलंबित करण्यात आले, तर २ केंद्रांना सक्त ताकीद देण्यात आली आहे. कृषी सेवा केंद्रांमध्ये खळबळ उडाली आहे.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुणवत्ता नियंत्रण पथके सध्या तालुका स्तरावर धडक तपासण्या करत आहेत. खरीप हंगामात खतांची कृत्रिम टंचाई निर्माण होऊ नये, तसेच शेतकऱ्यांची फसवणूक टाळावी, या उद्देशाने ही मोहीम राबवली जात आहे. तपासणीदरम्यान ई-पॉस यंत्रावर विक्रीची नोंद न करणे, शेतकऱ्यांना पक्के बिल न देणे, साठा नोंदी अद्ययावत न ठेवणे अशा प्रकारच्या अनियमितता आढळून आल्या.कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मते, खत विक्री ही पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने होणे अपेक्षित आहे. मात्र काही केंद्रांकडून नियमांकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे खत नियंत्रण आदेश १९८५ अंतर्गत थेट कारवाईचा बडगा उगारण्यात आला. यंदा प्रशासनाने 'पहिल्याच टप्प्यात कडक कारवाई'चा स्पष्ट संदेश दिल्याचे चित्र आहे. दरम्यान, जिल्ह्यात खतांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.ई-पॉस नोंद टाळणे, पक्के बिल न देणे किंवा साठा नोंदीत त्रुटी ठेवणे यांसारख्या बाबी आढळल्यास संबंधित केंद्रांवर थेट निलंबनाची कारवाई केली जात आहे. त्यामुळे विक्रेत्यांनी नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक ठरले आहे.

# पारखेड परिसरात बॅनरची तोडफोड ; अज्ञाताविरुद्ध गुन्हा

### - पारखेड परिसरात समाजबांधवांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती
### - धार्मिक व सामाजिक भावना दुखावल्याचा आरोप

**खामगाव :** पारखेड येथील नवीन बसस्थानक परिसरात लावण्यात आलेल्या डिजिटल बॅनरची तोडफोड करून त्यावरील प्रतिमा फाडल्याची घटना घडली असून, याप्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, पारखेड येथे तणावपूर्ण शांतता आहे. फिर्यादी मिलिंद जनार्धन बांगर (३६) हे स्थानिक क्रीडा मंडळाचे सदस्य आहेत. त्यांच्या मंडळाच्या वतीने गावातील बसस्थानक परिसरात डिजिटल बॅनर लावण्यात आला होता. १६ एप्रिल रोजी मध्यरात्री सुमारे २:३० वाजता अज्ञात व्यक्तीने या बॅनरची तोडफोड करून त्यावरील प्रतिमा फाडल्याचा आरोप करण्यात आला आहे. या कृत्यामुळे धार्मिक व सामाजिक भावना दुखावल्याचा दावा फिर्यादीने तक्रारीत केला आहे.

या तोंडी अहवालावरून संबंधित पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास पोलिस निरीक्षक किशोर तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.घटनास्थळी पुरावे गोळा करण्यासाठी ठसे तज्ज्ञ (फॉरेन्सिक टीम) आणि श्वान पथकाला पाचारण करण्यात आले आहे. पोलिसांकडून बारकाईने तपास सुरू असून, घटनास्थळावरील तांत्रिक पुरावे संकलित केले जात आहेत. प्राप्त माहितीनुसार, डिजिटल बॅनरवर दोन इसमांच्या हाताचे ठसे उमटल्याची चर्चा असून, त्या दिशेने पोलिसांचा तपास सुरू आहे. लवकरच आरोपी जेरबंद केले जातील, अशी हमी पोलिस प्रशासनाने ग्रामस्थांना दिली.

# शेतातील कूपनलिकेमधून मोटार, पाइप व केबल चोरी; २० हजारांचा मुद्देमाल लंपास

प्रतिनिधी १८ एप्रिल

**शेगांव :** शेगाव शेतातील कूपनलिकेमधील इलेक्ट्रिक मोटार, एचडीपीई पाइप व केबल असा एकूण २० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना शुक्रवार, १७ एप्रिल रोजी उघडकीस आली. याप्रकरणी शेगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी विलास नामदेव थोंबे (रा. वरखेड, ता. शेगाव) यांचे सर्व्हे क्रमांक ६८, भाग १, शेगाव येथे शेत आहे. १७ एप्रिल रोजी सकाळी सुमारे ६ वाजण्यापूर्वी अज्ञात आरोपीने त्यांच्या शेतातील कूपनलिकेमधील ३ एचपी क्षमतेची इलेक्ट्रिक मोटार (अंदाजे किंमत १०,००० रुपये), २५० फूट लांबीचा काळ्या रंगाचा एचडीपीई पाइप (अंदाजे किंमत ५,००० रुपये) तसेच केबल (अंदाजे किंमत ५,००० रुपये) असा एकूण २०,००० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला.शेतात गेल्यानंतर चोरी झाल्याचे लक्षात येताच फिर्यादीने त्याच दिवशी दुपारी १२:४९ वाजता शेगाव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३०३(२) अन्वये अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल संतोष गवई करीत आहेत.

# सीबीएसईचा युगधर्म पब्लिक स्कूलचा १०० टक्के निकाल

खामगाव : स्थानिक युगधर्म पब्लिक स्कूल, खामगाव येथील केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ दहावी परीक्षा २०२६ चा निकाल यावर्षीही शंभर टक्के लागून शाळेची यशाची परंपरा कायम राहिली आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही शाळेचा दहावीचा निकाल उत्कृष्ट लागला असून विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. यंदा कु. अनुष्का भिसे हिने ८९.००३ गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. विशेष म्हणजे, परीक्षेच्या काळात तिच्या वडिलांचे आजाराने निधन झाले असतानाही तिने अत्यंत धैर्याने व शिक्षक व शाळेचे अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली हे यश मिळवले. मराठी व माहिती तंत्रज्ञान या विषयांत १०० पैकी १०० गुण मिळवत ती खामगाव शहरात प्रथम आली आहे. तसेच कु. सिया जैस्वाल हिने ८६.००३ गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळवला. याशिवाय शाळेतील कृष्णा सुल्ताने, शिवानी सुकाळे, संजीवनी पांढरे, भक्ती लोंढे, प्रिया इंगोले, स्वरित नेटके, तेजस सोंटक्के, हिमांशू बिडकर, समीक्षा राजपूत व ओम गवई हे विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले असून इतर सर्व विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण



झाले आहेत. शाळेचे अध्यक्ष श्री. गोपाल अग्रवाल यांनी सर्व विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच शाळेचे सचिव श्री. मधुर अग्रवाल यांनी शिक्षक व पालकांच्या सहकार्यामुळे हे यश शक्य झाले असल्याचे सांगितले. या यशाबद्दल युगधर्म पब्लिक स्कूलचे खामगाव शहरात सर्वत्र कौतुक होत आहे.

# जि.प. कर्मचाऱ्यांच्या बदलीवर तात्पुरती स्थगिती

### जनगणना सुरळीत पार पाडण्यासाठी शासनाचा निर्णय

**बुलढाणा :** राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाने जनगणना २०२६ च्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचा निर्णय घेतला असून जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बदली प्रक्रियेला तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. गृह सचिव, भारत सरकार यांच्या निर्देशानुसार जनगणना अधिनियम १९४८ वजनगणना नियम १९९० अंतर्गत कामे सुरळीत पार पडावीत, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

जनगणना प्रक्रियेत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, तसेच प्रशासनिक सातत्य राखले जावे, यासाठी जिल्हा परिषद स्तरावरील सर्व गट-क व गट-ड कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदली प्रक्रिया सन २०२६ मध्ये राबविण्यात येणार नाही. याबाबत संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना सूचना देण्यात आल्या असून या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच यासंदर्भातील अनुपालन अहवाल शासनास सादर करण्यास सांगितले आहे.

# ज्ञानगंगा अभयारण्यातील पाणवठे वन्यप्राण्यांसाठी जीवनदायी

### पाण्यासाठी मानवी वस्त्यांकडे येण्यापासून रोखण्याचा वनविभागाचा उपक्रम

प्रतिनिधी १८ एप्रिल

खामगाव : वनविभागाच्या दरवर्षीच माध्यमातून मोठ्याप्रमाणात कृत्रिम पाणवठे तयार केले जातात. वन्य प्राण्यांची तहान भागविण्यासाठी हे पाणवठे जीवनदायी ठरतात. ज्ञानगंगा अभयारण्यात तब्बल २० पाणवठ्याचे पुनर्जिवन करण्यात आले आहे. या पाणवठ्यात नियमित टँकर किंवा कुपनलिकेच्या माध्यमातून पाणी भरल्या जात आहे. वनविभागाचा हा उपक्रम तहान भागविण्यासाठी वन्यप्राण्यांना मानवी वस्त्यांकडे रोखण्यासाठी



महत्त्वाचा ठरत आहे.

कडक उन्हामुळे जंगलातील नदी, नाले व तलाव यासारखे नैसर्गिक जलस्त्रोत आटतात. त्यामुळे वन्यप्राणी पाण्यासाठी मानवी वस्त्यांकडे धाव घेतात. त्यांना रोखण्यासाठी पाणवठे केल्या जातात. यामध्ये सिमेंटचे पाणवठे, ठराविक अंतरावर हौद किंवा खड्डे तयार करुन बनविल्या जातात. त्यामध्ये जाड प्लॅस्टिक कागद अंथरुन पाणी साठविले जाते. या पाणवठ्यात टँकर व्दारे नियमित पाणी भरल्या जाते. किंवा बोरवेलवर सौरपंपा व्दारे स्वयंचलित पध्दतीने

पाणवठ्यात पाणी सोडल्या जाते. या पाणवठ्या मुळे वन्यप्राणी मानवी वस्त्यांकडे धाव घेणे टाळतात. ज्ञानगंगा अभयारण्यात उपरोक्त प्रकारचे तब्बल २० पाणवठे विविध ठिकाणी तयार करण्यात आले आहे.

या पाणवठ्यांची साफसफाई करुन सदर पाणवठे दररोज पाण्याने भरल्या जातात. वेळोवेळी त्यामधील पाणी सुध्दा बदल केल्या जाते. जेणेकरुन वन्य प्राण्यांना इतर आजार होवू नये यासाठी ही दक्षता घेतल्या जात आहे. ज्ञानगंगा अभयारण्यातील पाणवठे आता वन्यप्राण्यांसाठी जीवनदायी ठरु लागले आहेत.

# नांदुऱ्यात दोन ठिकाणी चोरट्यांचा डल्ला

प्रतिनिधी १८ एप्रिल

**नांदुरा :** तालुक्यात घरफोड्यांच्या घटनांत वाढ होत असून वडाळी व पयोष्णी नगर येथे अज्ञात चोरट्यांनी दोन ठिकाणी घरफोडी करत लाखो रुपयांचा ऐवज लंपास केल्याच्या घटना १७ एप्रिल रोजी उघडकीस आल्या आहेत. पहिली घटना वडाळी येथे घडली. फिर्यादी लक्ष्मण श्रीराम वक्टे (५८) यांच्या राहत्या घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी आत प्रवेश केला. घरातील कपाट उघडून अंदाजे २६ ग्रॅम सोन्याचे दागिने व १० हजार रुपये रोख असा एकूण सुमारे चार लाख रुपयांचा मुद्देमाल चोरून नेण्यात आला. दुसरी



घटना नांदुरा शहरातील पयोष्णी नगर येथे घडली. फिर्यादी दिनेशसिंह हिंमतसिंह राजपूत (६३) यांच्या घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी घरात प्रवेश केला. कपाटातील लॉकर फोडून साडेतीन तोळे सोन्याची गहुमणी पोत, ७० हजार रुपये रोख व महत्त्वाची कागदपत्रे असा एकूण सुमारे सहा लाख रुपयांचा ऐवज लंपास करण्यात आला.

# शिवछत्रपती क्रीडापीठाच्या क्रीडा प्रबोधिनींसाठी प्रवेश सुरू

### २३ एप्रिलपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन




प्रतिनिधी १८ एप्रिल

**बुलढाणा :** शिवछत्रपती क्रीडापीठ अंतर्गत विविध क्रीडा प्रबोधिनींमध्ये सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी नवीन खेळाडूंच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. ही प्रवेश प्रक्रिया सरळ प्रवेश व कौशल्य चाचणीच्या माध्यमातून निवासी व अनिवासी खेळाडूंकरिता राबविण्यात येणार आहे.

विभाग व राज्यस्तरीय कार्यक्रम तसेच विभागस्तरावर होणाऱ्या चाचण्यांसाठी खेळाडूंचा डेटा संकलित करण्यासाठी गुगल लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे. सर्व इच्छुक खेळाडूंनी https://forms.gle/aqnpWXJKP2wsMVpdA या लिंकद्वारे नोंदणी करावी. नोंदणीची अंतिम तारीख २३ एप्रिल २०२६ पर्यंत आहे. यानंतर नोंदणीकृत खेळाडूंची यादी खेळ व चाचणीनिहाय संबंधित विभागीय उपसंचालकांकडे पाठविण्यात येईल. जे खेळाडू गुगल लिंकवर नोंदणी करणार नाहीत, त्यांच्या नावांची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी संबंधित विभागीय उपसंचालकांना त्वरित कळवावी. तसेच, चाचणीच्या दिवशी प्रत्यक्ष उपस्थित राहणाऱ्या खेळाडूंनाही चाचणीची संधी देण्यात येणार आहे. नोंदणीकृत सर्व खेळाडूंना चाचणीचे ठिकाण व दिनांक विभागीय उपसंचालकांकडून कळविण्यात येईल. जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यातील खेळाडूंना ही माहिती पोहोचवावी. क्रीडा प्रबोधिनी प्रवेशासाठी चाचण्या प्रथम विभागस्तरावर व त्यानंतर राज्यस्तरावर आयोजित करण्यात येतील.

# उन्हापासून संरक्षणासाठी सनकोटची मागणी वाढली



### महिला आणि मुलींमध्ये सुती रुमालांची वाढती मागणी

**खामगाव :** सूर्याच्या वाढत्या उष्णतेमुळे शहरातील तापमान सतत वाढत आहे. यामुळे, उन्हापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी महिला आणि मुलींमध्ये सनकोटची मागणी वाढली आहे, असे विक्रेत्याने सांगितले. गेल्या काही दिवसांपासून ऊन खूप कडक आहे. उष्णता वाढल्याने घराबाहेर पडणे कठीण झाले आहे. यामुळे सरकारी, निम-सरकारी आणि खाजगी कर्मचाऱ्यांना कडक उन्हाचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे, उन्हापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी कामगार वर्ग, कर्मचारी आणि विशेषतः महिला सनकोट आणि सनग्लासेस खरेदी करण्यावर अधिक भर देत आहेत.सूर्यप्रकाशापासून संरक्षण करणारे हातांचे हातमोजे उपलब्ध आहेत.डॉक्टर उन्हापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी सुती स्कार्फ वापरण्याची शिफारस करतात. हे सुती स्कार्फ गुलाबी, निळा, पिवळा, नारंगी आणि पिस्ता रंगांमध्ये उपलब्ध आहेत.उन्हाळ्यासाठी बाजारात सुती रुमाल, सनकोट आणि स्टोल मिळतात. सनकोट घातल्याने उन्हामुळे त्वचा भाजण्यापासून बचाव होऊ शकतो. हे सनकोट शुद्ध सुती आणि पॉलिस्टर-मिश्रित सुती कापडात मिळतात. त्यांच्यावर निळ्या, हिरव्या, लाल, गुलाबी आणि नारंगी रंगांतील भरतकाम केलेले सनकोट मुलींमध्ये लोकप्रिय होत आहेत.

### गॉगल लोकप्रिय होत आहेत

आजकाल सर्व ऋतूंमध्ये गाडी चालवताना चष्मा वापरला जातो. मात्र, वाढत्या उष्णतेमुळे त्याची मागणी वाढली आहे. चष्मा सूर्यप्रकाशाची तीव्रता कमी करतो आणि डोळ्यांची जळजळ व लालसरपणा देखील टाळतो. त्यामुळे नागरिकांमध्ये, विशेषतः वाहनचालकांमध्ये चष्म्याची मागणी वाढली आहे. या वाढत्या मागणीला प्रतिसाद म्हणून विक्रेत्यांनी त्यांच्या किमतीही वाढवल्या आहेत. चष्म्याची किंमत ९९ रुपयांपासून ते २००-३०० रुपयांपर्यंत आहे. सनकोट आणि सुती स्कार्फ ५० ते १५० रुपयांना उपलब्ध आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शनिवार, दि. १८ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# पटवी ज्वेलर्स अकोलेकर ग्राहकांच्या विश्वासाचे दालन....!

## गेल्या ५१ वर्षांपासून आम्ही तुमचे विश्वासू सोबती

प्रतिनिधी १८ एप्रिल

**अकोला:** पटवी ज्वेलर्सने अक्षय तृतिया निमित्त आकर्षक दागिने ग्राहकांना उपलब्ध करून दिले आहेत. प्रत्येक महत्त्वाचे क्षण अधिक संस्मरणीय बनवेल यावर भर दिला आहे. गेल्या ५१ वर्षांपासून आम्ही तुमचे विश्वासू सोबती आहोत आणि हे नाते अधिक घट्ट करण्यासाठी, आम्ही सादर करत आहोत सुंदर आणि आकर्षक दागिन्यांचे अप्रतिम कलेक्शन असा विश्वास पटवी ज्वेलर्सच्या संचालकांनी व्यक्त केला आहे. आमची प्रत्येक डिझाईन, मग ती एक साधी अंगठी असो किंवा एखादा भव्य हार, उत्कृष्ट कारागिरी आणि सौंदर्याचे प्रतिक आहे. आम्हाला माहित आहे की तुमची प्रत्येक खरेदी तुमच्यासाठी किती मोलाची आहे, म्हणूनच आम्ही आमच्या प्रत्येक दागिन्यावर सर्वात कमी मेकिंग चार्जेस (घडणावळ) आकारतो. याचाच अर्थ असा की, तुम्ही तुमच्या बजेटची काळजी न करता तुमचे आवडते दागिने खरेदी करू शकता. तर मग, आजच जुना कपडा बाजार चौकातील पटवी ज्वेलर्सला भेट द्या आणि स्वतःसाठी निवडा असे दागिने जे तुमच्या सौंदर्यात भर घालतील. आमचा संपर्क क्रमांक ७५१७३१६५०२, ८६६८३५१२६४ हा आहे.

# गॅस एजन्सीधारकांनी धरले ग्राहकांना वेठीस

प्रतिनिधी १८ एप्रिल

**अकोला:** अकोला जिल्ह्यातील काही गॅस एजन्सी धारकांच्या कारभारामुळे ग्राहक चांगलेच त्रासले आहे. बुकिंग झाल्यावर २ ते ३ दिवसात गॅस सिलेंडर थेट ग्राहकांना घरपोच देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्यावरही काही गॅस एजन्सी धारक ग्राहकांना उद्धट पनाची वागणूक देत असल्याचा एक व्हिडिओ चांगलाच व्हायरल होत आहे.

या व्हिडिओमध्ये ग्राहक जिल्हाधिकारी कार्यालयाने दिलेल्या आदेशाचे पालन करत नाही असे विचारतो त्याचवेळी गॅस एजन्सी वरील व्यक्ती हा 'कलेक्टर ऑफिस वालो की ऐसी की तैसी' त्याच्या प्रश्नाचे उत्तर देत असल्याचा प्रकार समोर आला आहे.


एकीकडे ४४ डिग्री तापमानामध्ये गॅस एजन्सी बाहेर ग्राहक तासनतास रांगेत उभे राहतात तर दुसरीकडे गॅस एजन्सी मधील कर्मचाऱ्यांकडून ग्राहकांना अशी वागणूक मिळते. यावर जिल्हा पुरवठा विभाग तसेच जिल्हाधिकारी काय कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ग्राहकांना घरपोच डिलिव्हरी देण्याऐवजी त्यांना वितरकाची गाडी उभी असेल त्याठिकाणी बोलावले जाते.

# अक्षय तृतियेची सुवर्णसंधी

## खंडेलवाल ज्वेलर्समध्ये नवीन कलेक्शन

प्रतिनिधी १८ एप्रिल





**अकोला :** सहा पिढ्यांची समृद्ध परंपरा लाभलेले आणि अकोलेकरांसह विदर्भातील ग्राहकांचा विश्वास संपादन केलेले खंडेलवाल ज्वेलर्स अक्षय तृतियेच्या शुभमुहूर्तावर आकर्षक व नवनवीन दागिन्यांच्या कलेक्शनसह सज्ज आहे. अकोल्यातील शोरूमसह बुलढाणा, वाशिम, अमरावती जिल्ह्यातील वरूड येथेही विशेष डिझाईन्स उपलब्ध करण्यात आल्याची माहिती संचालक नितीन खंडेलवाल यांनी दिली.

सोन्याचे दर वाढत असतानाही ग्राहकप्रिय योजनांमुळे अनेक कुटुंबांना मोठा लाभ झाला आहे. 'चित भी आपकी' योजनेअंतर्गत बुकिंग केलेल्या दरातच दागिने उपलब्ध करून देण्यात आल्याने दरवाढीचा फटका बसला नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. सध्या कमी वजनातील आकर्षक डिझाईन्सना विशेष मागणी असून लग्नसराईच्या पार्श्वभूमीवर पारंपरिक तसेच आधुनिक दागिन्यांना ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

सोन्याच्या पारंपरिक दागिन्यांबरोबरच कमी वजनातील नवे डिझाईन्स, डायमंड ज्वेलरीतील अंगठ्या, ब्रेसलेट, नाजूक पेंडंटसह चेन, प्लॅटिनम रिंग्स, कपल रिंग्स आदींची भव्य रेंज अक्षय तृतीयेच्या निमित्ताने पाहण्यासाठी उपलब्ध आहे. वर्षभर सुरू असलेल्या विविध बचत व लाभ योजनांमुळे ग्राहकांना सातत्याने फायदा होत असल्याचेही खंडेलवाल यांनी सांगितले.

अक्षय तृतियेपासून खंडेलवाल ज्वेलर्स मराठवाड्यात प्रवेश करीत असून जालना येथे नववे शोरूम सुरू होत आहे. मराठवाड्यातील पहिले आणि संस्थेचे नववे 'के जे नाईन' शोरूम जालन्यात सुरू होत असून ग्राहकांनी इतर शोरूमप्रमाणेच येथेही उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अक्षयतृतीया निमित्त सुवर्ण खरेदीसाठी विशेष सुवर्णयोग

## एस. एस. खरोटे सुवर्णकार शोरूम सज्ज

प्रतिनिधी १८ एप्रिल



**अकोला :** अक्षयतृतिया या साडेतीन मुहूर्तांपैकी एक शुभ पर्वानिमित्त सुवर्ण खरेदीसाठी ग्राहकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. शहरातील ज्वेलरी क्षेत्रात अनेक दशकांपासून विश्वासार्ह सेवा देणारे एस. एस. खरोटे सुवर्णकार प्रा. लि. यांनी गांधी चौकातील तीन मजली भव्य शोरूम ग्राहकांसाठी सज्ज केले आहे.

शोरूमचे संचालक शैलेश खरोटे आणि सुनील खरोटे यांनी सांगितले की, अक्षय तृतिया हा आपल्या संस्कृतीतील अत्यंत महत्त्वाचा दिवस मानला जातो. या दिवशी सोने, चांदी, प्लॅटिनम व हिरे खरेदी करणे शुभ मानले जाते. या शुभमुहूर्तावर खरेदी केल्यास ग्राहकांना समृद्धी व शुभफळ मिळते, अशी धारणा आहे.

### १ टक्क्यांपासून मेकिंग चार्ज सुरू

स्थानिक गांधी चौकात असलेल्या या शोरूममध्ये ग्राहकांसाठी विशेष ऑफर्स जाहीर केल्या आहेत. सोन्याच्या दागिन्यांवर केवळ १ टक्क्यांपासून मेकिंग चार्ज सुरू असून, जुन्या सोन्याच्या बदल्यात नवीन दागिने घेताना शून्य टक्के घट (नियम व अटी लागू) अशी आकर्षक योजना उपलब्ध आहे. यामुळे ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. शोरूममध्ये पारंपरिक तसेच आधुनिक डिझाइनमधील दागिन्यांची विस्तृत श्रेणी उपलब्ध आहे. यात मंगळसूत्र, टेम्पल ज्वेलरी, रिअल डायमंड ज्वेलरी, रोज गोल्ड, प्लॅटिनम ज्वेलरी तसेच नवीनतम डिझाइनचे आकर्षक दागिने यांचा समावेश आहे. अक्षयतृतिया निमित्त ग्राहकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेत सोने, प्लॅटिनम व हिरे दागिन्यांची खरेदी करून आनंद द्विगुणित करावा, असे आवाहन संचालकांनी केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट

आता आठ पानांचा,
नियमित वाचा,
आजची बातमी
आजचं

अमूल्य कळ्या

५ वा वाढदिवस



चि.हिमांशु प्रवीण वाडके
रा.अकोट

# शहरातील अत्यंत जुने आणि विश्वसनीय वाखारकर ज्वेलर्स

## गुणवत्ता आणि विश्वास जपणारी नामवंत सुवर्णपेढी.....

प्रतिनिधी १८ एप्रिल



**अकोला:** लग्नसमारंभ असो किंवा एखादा सण-उत्सव, अथवा उज्ज्वल भविष्यासाठी सोन्यामध्ये केलेली गुंतवणूक; जेव्हा प्रश्न विश्वासाचा येतो, तेव्हा शहरात एकच नाव अग्रक्रमाने घेतले जाते - वाखारकर ज्वेलर्स गुणवत्ता आणि विश्वासाची प्रदीर्घ परंपरा जपणारी ही शहरातील अत्यंत जुनी आणि नामांकित सुवर्णपेढी आहे, ज्यावर ग्राहक डोळे झाकून विश्वास ठेवतात.

लग्नसराई असो, सण असो वा गुंतवणुकीसाठी सोने खरेदी, आपल्या सर्वांची पहिली पसंती म्हणजे वाखारकर ज्वेलर्स! गांधी रोड परिसरातील 'झी महासेल' शेजारी, आझाद कॉम्प्लेक्स येथे स्थित असलेल्या वाखारकर ज्वेलर्सला आजच भेट द्या.

येथे आपल्याला मिळेल शुद्ध सोन्यापासून बनवलेले पारंपरिक आणि फॅन्सी दागिने, ज्यामध्ये प्रामुख्याने बीआयएस हॉलमार्क ज्वेलरी, खास पेशवाई ज्वेलरी, चांदी आणि मोत्यांचे अलंकार, नक्षीदार आणि कलाकुसरीचे दागिने, शुद्ध चांदीच्या वस्तू आणि भांडी. इतकेच नाही, तर येथे 'गोल्ड लोन' सुविधा देखील उपलब्ध आहे. तसेच, ग्राहकांसाठी खास 'मासिक सुवर्ण खरेदी योजना' देखील सुरू आहे.

**मग उशीर कशाला?**
आजच वाखारकर ज्वेलर्सला भेट द्या आणि आपल्या पैशांचे योग्य मोल मिळवा.
कारण... 'उत्तम दर्जा हीच आमची ओळख' आणि 'शुद्धतेचा वादा, विश्वासाचा धागा'
**आमचा पत्ता:**
वाखारकर ज्वेलर्स, आझाद कॉम्प्लेक्स, गांधी रोड, अकोला.
संपर्क: ९८६०८ ६३१६७




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK